# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### धायरी (जि.पुणे) येथे बांधकाम प्रकल्पांना क्षमतेपेक्षा अधिक वीज भार दिल्याने ट्रान्सफार्मर चा स्फोट होण्याची निर्माण झालेली भिती

**(१) ७० (०२-०४-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धायरी (जि.पुणे) येथील बांधकाम प्रकल्पांना क्षमतेपेक्षा अधिक वीज भार दिल्याने ट्रान्सफार्मर चा स्फोट होण्याची भीती निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धायरी व नऱ्हे भागात मोठ्या लोकवस्तीच्या ठिकाणी बांधकाम प्रकल्पांना अनियमितपणे ट्रान्सफार्मर मधून वीज भार दिला जात असल्याचे दि. १९ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, याच कालावधीत महावितरणमधील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने धायरी व नऱ्हे भागात रस्त्यावरील ट्रान्सफार्मरवर क्षमतेपेक्षा अधिक वीजभार देण्यात येत असल्याचे चौकशी अंती निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) व (२) माहे जानेवारी, २०२० मध्ये वर्तमान पत्रामध्ये सदर स्वरुपाची बातमी छापून आल्याचे निदर्शनास आले.

धायरी व नऱ्हे हा महावितरणच्या पर्वती विभागातील जास्त लोकवस्तीच्या व विकसनशील भाग असून तेथे नवीन बांधकाम प्रकल्पांना त्यांच्या मागणीनुसार व महावितरणच्या नियमास अधीन राहून वीज पुरवठा करण्यात येतो.

(३) व (४) हे खरे नाही. या भागातील गृह संकुलाना महावितरणच्या नियमानुसार रोहित्रासाठी जागेची नोंदणीकृत करारनामा करुन नवीन रोहित्रांचे काम करुन त्याद्वारे वीज पुरवठा देण्यात आलेला आहे. धायरी शाखेत एकूण ३७२ रोहित्रे असून ८०% पेक्षा अधिक वीज भार जोडलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील अकोला ठाकरे, हिवरा साबळे, खंडाला देवी, खानापूर, रत्नापूर गावातील शेतक-यांना सुरळीत वीज पुरवठा करण्याबाबत**

**(२) १३४९ (०७-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील अकोला ठाकरे, हिवरा साबळे, खंडाला देवी, खानापूर, रत्नापूर गावातील शेतक-यांना केवळ ६ तासच वीज पुरवठा करण्यात येत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच इतर काही गावात मात्र १२ तास वीज पुरवठा करण्यात येतो हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिकांनी महावितरण कंपनीकडे तकार केली असून महावितरण कंपनीकडून कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त गांवाना सुरळीत विजपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :**(१) राज्यातील कृषी वाहिन्यांवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार दिवसा ८ तास किंवा रात्री १० तास असा ३ फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने करण्यात येतो. तसेच फक्त स्थानिक पातळीवर अचानक काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आवश्यकतेनुसार तात्पुरते भारनियमनाचे नियोजन करुन ग्राहकांना सुरळीतपणे विद्युत पुरवठा केला जातो. परंतु, सन २०१९ च्या रब्बी हंगामात उपरोक्त भागातील शेतकऱ्यांना वीज पुरवठा करणाऱ्या ३३/११ के.व्ही लोणी गवळी उपकेंद्रामधून निघणाऱ्या ११ के.व्ही. अंध्रुड कृषी वाहिनीवरील कृषी पंप ग्राहकांचा वीज भार वाढल्याने सदर वाहिनी अतिभारीत होत होती. त्यामुळे दिनांक १२.०३.२०२० पर्यंत वीजभारानुसार वाहिनीची विभागणी करुन दोन एबी स्वीचद्वारे कृषी पंपाना वीज पुरवठा करण्यात येत होता.

सद्यस्थितीत, ११ के.व्ही अंध्रुड या अतिभारीत कृषी वीज वाहिनीवरील अतिरिक्त भार हा ३३/११ के.व्ही खंडाळा या नवीन उपकेंद्रातुन निघणाऱ्या ११ के.व्ही खंडाळा या कृषी वीज वाहिनीवर दिनांक १२.०३.२०२० रोजी जोडण्यात आला असून आता सदर गावांतील सर्व कृषी ग्राहकांना ८ तास दिवसा किंवा १० तास रात्री असा चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. उपाययोजना म्हणून सदर ११ के.व्ही. अंध्रुड कृषी वीज वाहिनी वरील काही वीज भार ३३/११ के.व्ही खंडाळा उपकेंद्रावरुन नव्याने कार्यान्वीत झालेल्या ११ के.व्ही. खंडाळा कृषी वाहिनीवर जोडण्यात आला असून आता सर्व कृषी पंप वीज ग्राहकांना ८ तास दिवसा किंवा १० तास रात्री असा चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरळी ते शिवडी उन्नत मार्ग निर्माण करण्याबाबत**

**(३) १५८५ (०३-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास च्या १४७ व्या बैठकीत वरळी ते शिवडी उन्नत मार्गास मंजूरी मिळनूही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उन्नत मार्ग निर्माण करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत, तसेच विलंब दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२१) :** (१) व (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. २७ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या १४७ व्या बैठकीत वरळी ते शिवडी उन्नत मार्गास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर माहे मार्च २०१९ मध्ये प्रकल्पाकरीता निविदा बोलविण्यात आल्या. तथापि, निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत केवळ एकच निविदा प्राप्त झाल्याने माहे ऑगस्ट २०१९ मध्ये दुसऱ्यांदा निविदा बोलाविण्यात आल्या. या अनुषंगाने चार निविदाकारांकडून निविदा प्राप्त झाल्या. निविदा प्रक्रियेअंती मे जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स यांची प्रकल्पाकरीता कंत्राटदार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सदर कंत्राटदारास दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील नियोजित टायर बेस्ड महामेट्रो प्रकल्प रद्द करण्याबाबत**

**(४) १६९१ (०३-०४-२०२०). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील नियोजित टायर बेस्ड महामेट्रो प्रकल्प रद्द करण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकल्प रद्द केल्याने शहरातील नागरिकांवर अन्याय होत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टायर बेस्ड महामेट्रो प्रकल्प रद्द करण्याची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये केंद्र शासनास सादर करण्यात आला असून, माहे मार्च, २०२१ मध्ये केंद्र शासनाच्या सार्वजनिक गुंतवणूक मंडळाने (पीआयबी) प्रकल्प प्रस्तावास मान्यता दिली आहे. सद्य:स्थितीत प्रकल्प प्रस्ताव केंद्र शासनाच्या मंजूरीच्या अंतिम टप्प्यात आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मेट्रो-१ च्या पवई ते साकीनाका मार्गावर एमएमआरडीएने खासगी संस्थांना प्रवासी वाहतूक करण्यास दिलेली परवानगी**

**(५) १७२४ (२१-०३-२०२०). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेस्ट परिवहन सेवा तोट्यात असतांना मेट्रो-१ च्या पवई ते साकीनाका मार्गावर एमएमआरडीएने खासगी संस्थांना प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी देण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे बेस्ट सेवा अधिक तोटयात जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खंडाळा (जि.बुलढाणा) येथील विद्युत पुरवठा चिखली शहरातून करण्याबाबत.**

**(६) १७७७ (१९-०४-२०२०). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खंडाळा (जि.बुलढाणा.) येथील विद्युत पुरवठा सन १९८२ पासून चिखली शहराच्या धर्तीवर अखंड व निरंतर सुरु आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्युत अधिकारी यांनी आर्थिक संगनमत करून खंडाळा (म.) येथील विद्युत पुरवठा अन्य ठिकाणाहून जोडणी केल्याने तेथील विद्युत ग्राहकांना अनियमित वीज पुरवठा होत असून वारंवार वीज जाणे, वीज कमी जास्त दाबाने मिळणे; तसेच विद्युत उपकरणे नादुरुस्त होण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खंडाळा (म.) येथील विद्युत पुरवठा अन्य ठिकाणाहून करण्याच्या प्रकरणाची चौकशी करून तेथील विद्युत ग्राहकांना पूर्वीप्रमाणे किंवा चिखली एम.आय.डी.सी. मधून विद्युत पुरवठा करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अधीक्षक अभियंता, महावितरण, बुलडाणा यांचेकडे लेखी स्वरुपात केली आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) दिनांक १९.०१.२०१५ पासून खंडाळा (म.) गावाच्या कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा हा ३३ के.व्ही एम.आय.डी.सी., चिखली उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही.खंडाळा कृषी वाहिनीवरुन करण्यात येतो. खंडाळा (म.) गावठाणाचा वीज पुरवठा ३३ के.व्ही लाल माती उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही शेलसूर गावठाण फिडरद्वारे करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्हयातील शेती व बागायतीसाठी पाणी उपसा करण्यास कृषीपंपाला वीज जोडणी मिळण्याबाबत**

**(७) ३०७४ (०९-०४-२०२०). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्हयात शेती व बागायतीकरिता पावसाळी हंगाम वगळता पाण्याकरिता नदी व विहीरीवर पंप बसवून पाणी उपसा करावे लागते यामुळे कृषीपंपाला वीज जोडणी मिळावी याकरिता शेतक-यांनी महावितरणकडे अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणीकडे ७५० हून अधिक वीज जोडणीची प्रकरणे प्रलंबित असून दिनांक ३१ मार्च, २०१८ नंतर कृषीपंपाना वीज जोडणीसाठी नवीन अर्ज स्वीकारणे बंद झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित असलेली वीज जोडणी व नवीन अर्ज स्वीकारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सिंधुदूर्ग जिल्हयात दि. ३१.०५.२०२१ पर्यंत ६७० शेतीपंप अर्ज प्रलंबित असून यापैकी दि. ३१.३.२०१८ पर्यंत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ५८३ कृषीपंप अर्जदारांपैकी जून, २०२१ अखेर ८० वीज कनेक्शन उच्चदाब वितरण प्रणाली योजने अंतर्गत देण्यात आलेली आहे व ९० वीज कनेक्शन सिंगल फेज प्रणालीवर असे एकूण १७० कृषी पंपांना वीज जोडणी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेत एकूण ५१७ अर्ज हे उपरोक्त ६७० प्रलंबित अर्जाच्या व्यतिरिक्त प्राप्त झाले असून त्यापैकी २५६ लाभार्थ्यांनी मागणी पत्राचा भरणा केलेला असून २२७ सौरकृषी पंप आस्थापित करण्यात आलेले आहेत. ऊर्जा विभागाच्या दिनांक १८ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयाद्वारे दिनांक १.०४.२०१८ नंतरच्या प्रलंबित कृषीपंपाना जोडणी देण्याबाबतचे धोरण जाहीर करण्यात आले असून अनुज्ञयतेनुसार कृषीपंपाना वीज जोडणी देण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील चेंबूर ते वडाळा या पहिल्या आणि वडाळा ते संत गाडगे महाराज चौक या दुसऱ्या टप्प्यातील मोनो रेलच्या कामाबाबत**

**(८) ३१२१ (२१-०३-२०२०). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर ते वडाळा या पहिल्या आणि वडाळा ते संत गाडगे महाराज चौक या दुसऱ्या टप्प्यातील मोनोरेल मध्ये विविध समस्या कायम असल्याची बाब माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीए प्राधिकरणाकडून कोट्यवधी रुपये खर्च करुन चालविण्यात येणाऱ्या मोनोमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड, वेळकाढू प्रवास, स्वच्छतागृहांचा अभाव, बेघर-गर्दुल्यांच्या वावर व इतर समस्या सोडविण्यात न आल्याने प्रवासी त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

मोनोरेल प्रकल्पाचे कंत्राटदार म्हणून मे. एल. ॲण्ड टी. व स्कोमी इंजिनियरींग बी. एच. डी. यांची नेमणूक २००८ साली करण्यात आली होती. कंत्राटदार समूहाकडून करारातील अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याने सदर कंत्राट दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी रद्द करून मोनोरेल प्रकल्पाचे संचलन व देखभालीचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे. कंत्राटदाराने करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार मोनोरेल गाड्यांच्या नियमित देखभालीकरीता लागणारे सुटे भाग आणि दैनंदिन वापरातील उपयोगी साहित्य न पुरवल्यामुळे गाड्यांची देखभाल नियमितपणे होऊ शकली नाही. त्याकारणाने मोनोरेल गाड्यांमध्ये तांत्रिक बिघाड येत आहेत.

(२) व (३) सदर प्रकल्प हाती घेतल्यानंतर प्राधिकरणामार्फत वडाळा ते संत गाडगे महाराज चौक दरम्यानचा ११.२० कि. मी लांबीचा दूसरा टप्पा ४ मार्च, २०१९ पासून प्रवासी वाहतुकीकरीता खुला करण्यात आला आहे. प्राधिकरणास कंत्राटदाराकडून प्रकल्प हाती घेताना केवळ ३ गाड्या संचालनास योग्य व इतर ४ गाड्या नादुरुस्त स्थितीत प्राप्त झाल्या होत्या. प्राधिकरणाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये प्रकल्प हाती घेतल्यानंतर अत्यावश्यक अतिरिक्त सुटे भाग प्राप्त करून उर्वरित मोनोरेल गाड्यांची पुर्नबांधणी केली. त्याअनुषंगाने, प्राधिकरणाने २ गाड्या वापरात आणल्या आहेत. सद्य:स्थितीत फक्त ५ गाड्या उपलब्ध असल्याकारणाने सदर सेवा २२ मिनटांच्या अंतराने चालू आहे. प्राधिकरणामार्फत नजिकच्या कालावधीत २ मोनोरेल गाड्या दुरुस्त करून मोनोरेल सेवा ७ गाड्यांच्या उपलब्धतेने १५ मिनिटांच्या अंतरावर सुरू ठेवण्याचे प्रस्तावित आहे. तसेच मोनोरेल प्रकल्पाच्या गाड्यांची संख्या वाढविण्याकरिता प्राधिकरणामार्फत १० मोनोरेल गाड्या खरेदीकरिता निविदा मागविण्यात येत आहे. मुंबई मोनोरेल हा देशातला एकमेव, विशिष्ट आणि जगातील काही स्थापित प्रकल्पापैकी एक प्रकल्प असल्याने, संचलन व देखभाली करिता अडचणीचा सामना करावा लागत आहे. प्राधिकरणामार्फत प्रकल्पाच्या पुनर्बांधणीच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात

येत आहेत. या व्यतिरिक्त स्वच्छतागृह, सुरक्षा दरवाजे, बेघर गर्दुल्यांना आळा, प्रवाशांकरिता बैठक आसन, पिण्याच्या पाण्याची सुविधा, मोफत इंटरनेट सुविधा, मोनोरेल मोबाईल ॲप, क्यूआर टिकीट प्रणाली इ. माध्यमातून सोयीसुविधा पुरवण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. मोनोरेल सेवा प्रवाशांना नियमित व सुरक्षित सुरु ठेवण्यास प्राधिकरण प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**अंनदूर सब स्टेशन (ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद) येथील महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी वीज पुरवठा खंडित केल्याबाबत**

**(९) ३९०६ (१०-०४-२०२०). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंनदूर सब स्टेशन (ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद) येथील महावितरणाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास वीज पुरवठा खंडित केला असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे,
(२) असल्यास, वीज पुरवठा खंडित झाल्याने सामान्य नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास महावितरणाच्या अधिकाऱ्यांसमक्ष भेट दिली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबनाची करणे काय ?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही. फुलवाडी सबस्टेशन मधून निघालेल्या अनंदूर फिडरवर जोडलेल्या मौजे चिवरी, तालुका तुळजापुर या गावातील एकूण २१२ वीज ग्राहकांची थकबाकी माहे नोव्हेंबर, २०१९ अखेर रु.१५.४४ लाख एवढी होती सदर ग्राहकांनी वीज बिलाचा भरणा न केल्यामुळे त्यांचा विद्युत पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडित करण्यात आला होता. वीज बिलाचा भरणा केल्यानंतर वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.
(३) हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनगांव बारी (जि.अमरावती) परिसरातील शेतातील कृषीपंपाचे भारनियमन वेळापत्रकाबाबत**

**(१०) ६४५० (०२-०४-२०२०). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगांव बारी (जि.अमरावती) परिसरातील २९ गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील कृषीपंपाचे भारनियमन दिवसा सकाळी १० ते ६ दिवस व रात्री ६ ते सकाळी १० वाजेपर्यत ४ दिवस असे वेळापत्रक वीज वितरण कंपनीने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे उपलब्ध विजेच्या वेळातही वीजपुरवठा वारंवार खंडीत होत असल्यामुळे येथील शेतक-यांची सिंचनासाठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले,

(४) असल्यास, भारनियमन कमी करुन उपलब्ध वेळेत वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) अमरावती जिल्ह्यासहीत संपूर्ण राज्यात कृषी पंपाना मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कृषीपंपाना दिवसा ८ तास किंवा रात्री १० तास असा चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(२) व (३) अंजनगांव बारी परिसरामध्ये एकूण १५ गावे असून त्यांना ३३/११ के.व्ही उपकेंद्र अंजनगांव मधून निघणाऱ्या ११ के.व्ही सातरगाव व ११ के.व्ही.निरसाना अशा दोन कृषी वाहीन्यांद्वारे वीज पुरवठा केला जातो. माहे जानेवारी, २०२० ते मार्च, २०२० या कालावधीत विविध तांत्रिक दोषांमुळे दोन्ही कृषी वाहिन्यांवर एकूण १४ वेळेस वीज पुरवठा खंडीत झाला होता. सदर वाहिन्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करुन वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मंचर (ता. आंबेगाव, जि. पुणे) परिसरातील वीज ग्राहकांना वेळेवर विज देयके मिळत नसल्याबाबत.

**(११) ६५३५ (०२-०६-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंचर (ता. आंबेगाव, जि. पुणे) परिसरातील बहूतांश वीज ग्राहकांना वीज देयके हे नेहमी अंतिम देयक दिनांकानंतर वाटप होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी वेळेत वीज देयके घरी न आल्याने ग्राहकांना वारंवार अतिरिक्त दंड भरावा लागत असल्यामुळे वीजग्राहक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी करुन येथील वीज वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१८-१०-२०२१) :** (१) मंचर परिसरातील ता.आंबेगाव, जि.पुणे अंतर्गत ग्रामपंचायत चांडोली बु. येथे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये एकूण २९७ वीज ग्राहकांना वीज देयके वेळेत मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) एजन्सीने सप्टेंबर महिन्यामध्ये २९७ वीज ग्राहकांना वीज देयके विलंबाने वाटप केल्यामुळे त्यांना विलंब आकार म्हणून रु.१६८७.८० ही रक्कम ग्राहकांना नुकसान भरपाई म्हणून फेब्रुवारी, २०२० च्या वीज देयकामध्ये परत करण्यात आली आहे.
(३) वीज देयकाची छपाई झाल्यानंतर शहरी भागात दोन व ग्रामीण भागात तीन दिवसांपेक्षा जास्त कालावधीत वीज देयक वाटप न झाल्यास, रु.०.१० प्रति दिवस प्रति ग्राहक हा दंड म्हणून व वीज देयके घरपोच वाटप न केल्यास, रु.२/- प्रति देयक दंड आकारण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यातील अमानी येथील ३३ केव्ही उपकेंद्रातंर्गत येणा-या गावांत विज पुरवठा सुरळीत होण्याबाबत

**(१२) ७३०४ (०३-०४-२०२०). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.वाशिम) तालुक्यातील अमानी येथील ३३ केव्ही उपकेंद्रातंर्गत येणाऱ्या गावांत वीज भारनियमन, वेळी-अवेळी खंडित होणारा विज पुरवठा यामुळे येथील रब्बी हंगामातील पिकांच्या सिचंनात व्यत्यय येत असून ग्राहक त्रस्त झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) अकोला परिमंडळ अंतर्गत वाशीम जिल्हयातील मालेगांव उपविभागाअंतर्गत अमानी येथे ३३/११ के.व्ही चे उपकेंद्र असून या उपकेंद्राची स्थापीत क्षमता ५ एम.व्ही.ए आहे. या उपकेंद्रातून ११ के.व्ही.च्या ४ वाहिन्या (११ के.व्ही झोडगा एक्सप्रेस, ११ के.व्ही.अमानी गावठाण, ११ के.व्ही अमानी एजी व ११ के.व्ही करंजी एजी) निघतात. ३३ के.व्ही अमानी उपकेंद्रास ३३ के.व्ही चा वीज पुरवठा १३२ के.व्ही. मालेगाव येथून होतो. रब्बी हंगामात सर्वच कृषीपंप ग्राहकांचा वीजभार एकाच वेळी येत असल्याने ३३/११ के.व्ही अमानी उपकेंद्रातील ११ के.व्ही अमानी एजी वाहिनी अतिभारीत होते. त्यामुळे भारव्यवस्थापनाचे हेतुने ११ के.व्ही अमानी एजी वाहिनीचे त्यावर असलेल्या विजभारानुसार तीन भागामध्ये विभाजन करुन (पांग्रीसाईड-भार१८० ॲम्पीअर, झोडगा साईडभार ८१ ॲम्पीअर व बोरगाव साईड भार १७४ ॲम्पीअर) ११ के.व्ही. उच्चदाब विद्युत वाहिनीवर स्थापीत एबी स्वीचद्वारे आळीपाळीने भारनियमन करुन वीज पुरवठा मर्यादित ठेवण्यात येतो व प्रत्येक भागाला ८ तास याप्रमाणे चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा करण्यात येत आहे.
(२) अमानी उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मर अतिभारीत असल्याकारणाने तेथे अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर (५ एमव्हीए) बसविणेचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील टाळेबंदी कालावधीतील सर्व वीज देयकांना तात्काळ स्थगिती देण्याबाबत**

**(१३) ११३२५ (१३-०७-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये गत तीन महिन्यापेक्षा अधिक काळ असलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत खाजगी आणि शासकीय वीज कंपन्यानी प्रत्यक्ष मीटर रिडींग न घेता अवाजवी वीज देयके आकारली असल्याचे माहे जुन, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाळेबंदी कालावधीतील रिडींग निर्बंध शिथिल झाल्यानंतर देयकाची आकारणी करताना जुनी भरलेली रक्कम वजा न केल्यामुळे तसेच योग्य त्या स्लॅबमध्ये वर्गीकरण न करता आकारणी केल्यामुळे प्रति युनिट दर आकारणी एकाच वेळी करण्यात आल्याने ग्राहकांना वाढीव देयके देण्यात आल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील औद्योगिक, व्यापारी व घरगुती स्वरुपाच्या सर्व वीज देयकांना तात्काळ स्थगिती देऊन ३०० युनिटपर्यंतची वीज देयके माफ करुन नव्याने वीज देयकांची आकारणी करण्यात यावी, अशी मागणी लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ६ जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने वीज देयके दुरुस्त करुन पाठविण्याबाबत तसेच ग्राहकांना सुयोग्य हप्त्यामध्ये रक्कम भरण्याची परवानगी देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २२ जून, २०२० रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित केलेले पत्र महावितरण कार्यालयास प्राप्त झाले आहे.
(४) महावितरणच्या वीज ग्राहकांना सुलभ हप्त्यामध्ये वीज बिल भरणा करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील घरगुती वीज १०० युनिटपर्यंत वापर करणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज देण्याबाबत**

**(१४) ११३२६ (१३-०९-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्वसामान्य वीज ग्राहकांना दिलासा देण्यासाठी १०० युनिटपर्यंत वीज मोफत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून तीन महिन्याच्या कालावधीत घरगुती वीज वापर करणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज देण्याबाबत नेमण्यात आलेली समिती आपला अहवाल सादर करणार असल्याची घोषणा मा. ऊर्जामंत्री महोदयांनी दि. ३ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरगुती वीज वापर करणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज देण्याबाबत नेमलेल्या समितीने अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, सदरहू अहवालातील कोणकोणत्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत आणि त्याची अंमलबजावणी केव्हापासून केली जाणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) शासन निर्णय दिनांक २२.०४.२०२० अन्वये वीज धोरण ठरविण्याबाबत समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या कार्यकक्षेत राज्यातील ० ते १०० युनीट विजेचा वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज देण्याबाबतची बाब अंतर्भूत करण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) सदर समितीद्वारे विविध मुद्यांच्या अनुषंगाने उपसमित्या स्थापन केल्या असून मुद्दयांचा एकमेकांशी असणारा संबंध पाहता विविध पर्यायाची तपासणी सुरु असून समितीद्वारे कालमर्यादेत शासनास शिफारशी करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील शेतकऱ्यांनी विहिरीवरील वीज मीटर जोडणीसाठी केलेली मागणी**

**(१५) ११५८७ (१५-०९-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे)तालुक्यातील एकूण ६५० ते ७०० शेतकरी विहिरीवरील वीज मीटर जोडणी साठी सन २०१४ पासुन मागणी करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहीरीवर वीज मीटर नसल्याने मुबलक पाणी असूनही शेतीसाठी वापरता येत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना वीज मीटर जोडणी देण्याबाबत दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्याना विहिरीवरील वीज जोडणी लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे. खेड तालुक्यामध्ये दि.३१.०३.२०२१ अखेर ४३९ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(२), (३) व (४) खेड व मावळ तालुक्यातील दिनांक ३१.०३.२०१८ अखेर प्रलंबित असलेल्या सर्व कृषी ग्राहकांना वीज पुरवठा देण्याकरिता प्रथमत: एच.व्ही.डी.एस. योजनेअंतर्गत शाखा कार्यालय निहाय अंशत: (पार्शल टर्नकी) निविदा प्रकाशित करण्यात आल्या होत्या. परंतु सदर निविदांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे या सर्व प्रलंबित कृषी ग्राहकांना वीज पुरवठा देण्याकरिता एकत्रित कामाची सर्वसमावेशक (फुल टर्नकी) निविदा प्रकाशित करण्यात आली होती. परंतु सदर निविदेस अत्यल्प प्रतिसाद मिळाला. त्यामुळे ठेकेदाराची नेमणूक न झाल्याने वीज जोडणी देणे प्रलंबित होते. त्यामुळे सदर बाबतीत मंचर व मुळशी विभागाने अंशत: (पार्शल टर्नकी) निविदा अंतर्गत नेमून दिलेल्या कंत्राटदाराकडून कंपनीच्या नियमानुसार सदर प्रलंबित कृषी ग्राहकांना वीज पुरवठा करण्याकरिता निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार सदर ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. तसेच खेड तालुक्यामध्ये दिनांक ३१.०३.२०१८ नंतर १६७ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. राज्यातील ३१.०३.२०१८ नंतर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्याकरिता “कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०” दिनांक १८.१२.२०२० रोजी जाहिर केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महावितरण कंपनीने परभणी येथे विद्युत विषयक कामे दिलेल्या कृष्णा मल्टीसर्व्हिसेस कंपनीने बनावट कागदपत्रे सादर करुन केलेला गैरव्यवहार**

**(१६) ११६५२ (१५-०९-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयात महावितरण कंपनीची विद्युत विषयक कामे व देखभालीची कामे करण्यासाठीच्या निविदाप्रक्रिया पूर्ण करून ते काम कृष्णा मल्टीसर्व्हिसेस या कंपनीला माहे फेब्रुवारी २०१४ मध्ये वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यादेश दिल्यानंतर सदर कंपनीला रक्कम वितरित झाली असतांना देखील अद्यापही कंपनीने कोणतेही काम पूर्ण केले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीने निविदाप्रक्रियेत पात्र होण्यासाठी बनावट कागदपत्रे जोडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृष्णा मल्टीसर्व्हिसेस या कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) मे. कृष्णा मल्टीसर्व्हिसेस, परभणी यांना विद्युत देखभाल कामाविषयी परभणी मंडळ, कार्यालयामार्फत कार्यादेश देण्यात आलेले नाहीत. तथापि, परभणी मंडळामध्ये माहे सप्टेंबर, २०१२ ते डिसेंबर, २०१२ या कालावधीत मे.कृष्णा मल्टीसर्व्हिसेस, परभणी ही एजन्सी विद्युत देयके छपाई व वाटपाचे काम करीत होती. सदर एजन्सीला माहे सप्टेंबर, २०१२ ते डिसेंबर, २०१२ या कालावधीत केलेल्या कामाकरिता कोटेशनद्वारे विद्युत देयक छपाईचे कार्योत्तर मान्यता कार्यादेश माहे जानेवारी, २०१४ ते माहे, फेब्रुवारी २०१४ दरम्यान देण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने सदर एजन्सीने केलेली कामे क्षेत्रीय कार्यालयाकडून प्रमाणीत केल्यानुसार सन २०१६ मध्ये त्यांना सदरची देयके अदा करण्यात आलेली होती.
(३) व (४) हे खरे आहे. सदर प्रकरणी महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे. परभणी मंडळ कार्यालयाने फेब्रुवारी, २०१४ मध्ये विद्युत देयके छपाई व वाटपाकरिता निवीदा काढण्यात आलेल्या होत्या. परंतु, सदर निविदेअंतर्गत मे.कृष्णा मल्टीसर्व्हिसेस, परभणी यांनी बनावट Solvency दिल्याचे निदर्शनास आल्याने निविदा क्र.टी-६२, टी-६३ व टी-६४ रद्द करण्यात आल्या. यामध्ये महावितरण कंपनीचे कुठलेही नुकसान झालेले नसून या अनुषंगाने मे.कृष्णा मल्टी सर्व्हिसेस, परभणी या एजन्सीला परभणी मंडळाअंतर्गत कुठल्याही ई-निविदेमध्ये सहभागी करुन घेतलेले नाही. तसेच सदर एजन्सीला परभणी मंडळाअंतर्गत आजपर्यंत कोणतेही कार्यादेश देण्यात आलेले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील हिंजवडी-चाकण मेट्रो कॉरिडॉरचा डी.पी.आर.करणेबाबत

**(१७) ११७८३ (१८-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील हिंजवडी आय.टी.पार्क, चाकण इंडस्ट्रीयल इस्टेट येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने आय. टी. कंपनींच्या कंपनीत काम करणारे व चाकण येथील कामगारांचे व नागरिकांचे दररोजचे सकाळ संध्याकाळचे दोन ते तीन तास वाहतूक कोंडीमुळे वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंजवडी आय.टी. पार्कमध्ये ये-जा करण्यासाठी तूर्तात एकच रस्ता उपलब्ध असल्यामुळे त्या रस्त्यावरील वाहतुकीचा ताण वाढून मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वाहतूक कोंडी दूर होण्याकरिता पी.एम.आर.डी. कडून पुणे हिंजवडी ते चाकण मेट्रो कॉरिडॉर सूरु करण्याबाबत विविध कंपन्या नागरिक, कामगार संघटना व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हिंजवडी शिवाजीनगर कॉरिडॉर प्रमाणे हिंजवडी चाकण मेट्रो कॉरिडॉरचा डी.पी.आर. करून प्रस्ताव शासन मान्यतेकरीता पाठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

पुणे जिल्हयातील हिंजवडी येथील आय.टी. पार्कमध्ये कार्यरत असलेल्या विविध कंपन्यांचे दररोज लाखो कर्मचारी ये-जा करत असतात. सदर भागातील शिवाजी चौक येथे वाहतूक कोंडी होत असते. तसेच खेड तालुक्यातील चाकण या भागामध्ये वाहन उत्पादन, कंपन्या व कारखाने इत्यादींच्या अवजड वाहनांच्या होत असलेल्या वाहतूकीमुळे वाहतूक कोंडी होत असते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) पुणे महानगर प्रदेशाचा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आलेल्या सर्वकष आराखडयामध्ये (सीएमपी -२०१८ क्षितीजवर्ष २०२८ व २०३८करीता विविध कॉरिडॉर्सवरती मेट्रो प्रणाली राबविण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे. त्यामध्ये क्षितीज वर्ष २०२८ करीता हिंजवडी ते चाकण असा एकूण ३०.०८ किमी लांबीच्या मेट्रो मार्गिकेची शिफारस करण्यात आली आहे.

प्राधिकरणामार्फत पुणे मेट्रो लाईन - ३ हिंजवडी ते शिवाजीनगर हा मेट्रो प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सदर मेट्रो मार्गिकेमध्ये हिंजवडी -चाकण या प्रस्तावित मेट्रो मार्गिकेमधील हिंजवडी ते वाकड (भुजबळ) चौक या लांबीपर्यंतच्या मेट्रो मार्गिकेचा अंतर्भाव होत आहे. तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सूचित केल्यानुसार महामेट्रो मार्फत हिंजवडी चाकण मेट्रो मार्गिकेमधील नाशिक फाटा ते चाकण (मोर्शी मार्गे) या मेट्रो मार्गिकेसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल मे. राईटस या केंद्र शासनाच्या संस्थेकडून तयार करुन घेण्यात आलेला आहे. सदरचा सविस्तर प्रकल्प अहवाल महामेट्रोमार्फत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूरीस्तव पाठविण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### विक्रमगड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तसेच पालघरचे नायब तहसिलदर यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

**(१८) ११८९० (१३-०९-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तसेच पालघरचे नायब तहसिलदर श्री.सी.के.पवार यांनी एका कंत्राटदाराला धमकावून स्वत:च्या खाजगी फार्महाऊसच्या अंतर्गत १५ फूट रस्ता मोफत तयार करून देण्याची मागणी केल्याप्रकरणी त्यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे जुन, २०२० मध्ये वा त्या दरम्यान अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी श्री.पवार यांचेवर भादंविच्या कोणकोणत्या कलमान्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत व या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे तसेच श्री. पवार यांचेविरूध्द यापूर्वी त्यांनी काम केलेल्या कार्यक्षेत्राच्या हद्दीतील पोलीस स्थानकात गुन्हे नोंदविण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे काय, असल्यास, त्यावेळी त्यांचेवर कोणकोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते व त्या प्रकरणांची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, श्री.पवार हे पालघर प्रांताचे शिरस्तेदार असताना त्यांचेविरूध्द वारंवार गुन्हे नोंद झालेले असताना त्यांच्याकडे पालघर नायब तहसिलदार, बोईसर विधानसभा निवडणूक अधिकारी व मुख्याधिकारी, विक्रमगड नगरपंचायत अशा महत्त्वाच्या पदांचा पदभार देण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच श्री. पवार यांच्याकडील एकूण मालमत्तेचा तपशील काय आहे, त्यांनी ही संपत्ती कशी मिळविली याची सखोल चौकशी शासनाने केली आहे काय,

(५) नसल्यास, सदरहू चौकशी शासन किती कालावधीत पूर्ण करणार आहे व त्यांनी अवैधरित्या मिळविलेली संपत्ती शासन जप्त करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व श्री.पवार यांचेविरोधात वारंवार दाखल होत असलेले गुन्हे पाहता त्यांना शासकीय सेवेतून तातडीने बडतर्फ करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-१०-२०२१) :** (१) होय , खरे आहे.

(२) सदर प्रकरणी श्री.चंद्रकांत पवार, नायब तहसिलदार यांच्यावर विक्रमगड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७५/२०२० भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम-७ प्रमाणे दाखल असून सदर गुन्हयांचा तपास लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांचेकडे तपासास आहे.

तसेच आरोपी लोकसेवक श्री. चंद्रकांत पवार यांच्याविरुध्द पालघर पोलीस स्टेशन, जि. पालघर येथे दि. १८/०३/२०१६ रोजी भा. दं. वि. सं. च्या कलम-३३६ अन्वये गु.र.नं. ४१/२०१६ गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात मा.न्यायालयाने लोकसेवक चंद्रकांत पवार यांना निर्दोष मुक्त केले आहे.

(३) कोरोना संसर्ग रोखण्याविषयीच्या कामकाजाबाबतचे गांभीर्य, तातडीची निकड व अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेऊन तसेच प्रशासकीय कारणास्तव श्री. सी.के.पवार, नायब तहसीलदार, यांचेकडे निवासी नायब तहसीलदार पालघर, जि.पालघर या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सुपूर्द करण्यात आला आहे.

(४) आरोपी लोकसेवक श्री. चंद्रकांत केवजी पवार यांच्या राहत्या घरातील व फार्म हाऊसच्या झडतीमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागास एकूण मिळून ७३,४६,४३०/- रुपये किंमतीची मालमत्ता आढळून आली आहे.

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दि. १६/०७/२०२० रोजीच्या आदेशान्वये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे कार्यालयामार्फत श्री. चंद्रकांत केवजी पवार यांच्या मालमत्तेची उघड चौकशी सुरू आहे.

(५) आलोसे चंद्रकांत पवार यांचे मालमत्तेची उघड चौकशी श्री.विलास मते, पो.नि.,असीबी., ठाणे हे करीत आहेत. सदरची उघड चौकशी विहित मुदतीत पूर्ण करुन चौकशीत निष्पन्न होणाऱ्या वस्तुस्थितीप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या कारवाईच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग त्यांच्या दि. ३०/०६/२०२० रोजीच्या आदेशान्वये श्री. चंद्रकांत केवजी पवार यांना दि. १४/०६/२०२० रोजी निलंबित करण्यात आले.

---

**शहापूर वीज वितरण कंपनीच्या सदोष कार्यपध्दीमुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याबाबत**

**(१९) ११९१२ (१५-०९-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरीचा पाडा (शहापूर) येथील नागरी वस्तीमध्ये शहापूर वीज वितरण कंपनीने (शेणवे उपकेंद्राच्या हद्दीमध्ये) दूरध्वनीच्या केबलकरिता उभारलेल्या जुन्या पोलवरून स्थानिक नागरिकांना व दुकानदारांना वीजजोडण्या दिल्या असून वीज वाहिनी करणाऱ्या मोठया केबल स्थानिक नागरिकांच्या घरांच्या छपरावर अवास्तवपणे पसरल्या असल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू वीज वितरण कंपनीकडून विदयुत देयके ही शेवटच्या दिवशी देवून ग्राहकांकडून व्याज व दंडापोटी अतिरिक्त रक्कम आकारणे, वीज चोरीला पाठीशी घालणे, ग्राहकांकडून सक्तीने वीज देयकांची वसुली करणे, इ. बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वीज वहन करणाऱ्या केबल कोसळून त्यामुळे अपघात घडण्याची शक्यता असल्याने येथील स्थानिक नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ठिकाणी वीज वहन केबलकरिता स्वतंत्र पोल उभारण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून वीज वितरण कंपनीकडे गत कित्येक महिन्यांपासून सातत्याने करण्यात येत असतानाही त्याकडे संबंधित वीज वितरण कंपनीकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू ठिकाणी तातडीने वीज वहन करणाऱ्या केबलकरिता स्वतंत्र पोल उभारण्याबाबत तसेच सदरहू वीज वितरण कंपनीच्या सदोष कार्यपध्दतीची सखोल चौकशी करून या प्रकरणी कार्यवाहीस विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. महावितरणच्या कल्याण मंडळ-२ मधील कल्याण ग्रामीण विभागातील शहापूर उपविभागात वीज बिल वितरणाची कामे ही मान्यताप्राप्त खाजगी कंपनीला दिलेली असून सदर एजन्सीद्वारे वीज बिल वितरणाची कामे वेळेत करण्यात येतात व तसे न झाल्यास एजन्सीवर महावितरण कंपनीच्या अटी व शर्तीनुसार कारवाई करण्यात येते. तसेच वीज चोरांवर विद्युत कायदा, २००३ अंतर्गत योग्य ती कारवाई करण्यात येते.

(३) पांढरीचा पाडा येथील नागरिक वस्ती मधील ०७ वीज ग्राहकांना ज्या पोलवरुन वीज पुरवठा केला आहे तो दूरध्वनीचा पोल नसून महावितरणच्या जुन्या कार्यपध्दतीमधील गोल पोल आहे व त्याची उंची जमिनीपासून अंदाजे २० फूट इतकी आहे. सदर ४ गोल पोलपैकी ०२ नादुरुस्त असलेले पोल हे बदलण्यात आले आहेत. उर्वरित ०२ पोल हे व्यवस्थित असून त्यापासून कोणताही धोका नाही. पोलवर कोणतीही केबल नसून अल्युनिनियम (ACSR Conductor) ची लघुदाब वीज वाहक तार आहे. त्या लघुदाब वीज वाहक तारांवरुन गेल्या काही वर्षापासून तेथील ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात येत असून सदर पोलवरील लघुदाब वाहिनीचे अंतर हे घरापासून सुरक्षित अंतरावर आहे.

सदर ठिकाणावरील लघुदाब वीज वाहक तार ही व्यवस्थित असल्याने तेथे कोणताही अपघात होण्याची शक्यता दिसून येत नाही. तसेच अद्याप अशा कोणत्याही घटनेची नोंद झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील शिराळा उपविभागीय कार्यालय शाखा सांगाव येथे विदयुत वाहिनीवर काम करताना कंत्राटी वीज कामगाराचा झालेला मृत्यु**

**(२०) १२५१३ (१३-०९-२०२०). श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली मंडळाच्या इस्लामपूर विभागीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या शिराळा उपविभागीय कार्यालय शाखा सांगाव येथे विदयुत वाहिनीवर काम करताना कंत्राटी वीज कामगाराचा विजेचा करंट लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची बाब माहे जून २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काम कंत्राटी कामगारांकडून करून घेण्याबाबत रीतसर परवानगी घेण्यात आली होती काय तसेच सदरहु कंत्राटी वीज कर्मचाऱ्यास रात्री ७.०० वाजता एच.टी. लाईनवर काम करण्याची परवानगी कोणत्या अधिकाऱ्यांच्या मंजुरीने देण्यात आली होती,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीच्या अनुषगांने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मृत कंत्राटी कामगाराच्या कुटुंबियाना आर्थिक नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक ०१.०६.२०२० रोजी श्री.अक्षय रामराव पाटील (बाह्यस्त्रोत कर्मचारी) वय १९ वर्षे म.रा.वि.वि.कं.मर्या शाखा सागाव मु.पो.कांदे, ता.शिराळा, जि.सांगली यांना प्रांणातिक अपघात घडला.

(२) दिनांक ०१.०६.२०२० रोजी नैसर्गिक वादळी वारे, संततधार पाऊस असल्याने ११ के.व्ही. सांगाव गावठाण वाहिनीमध्ये बिघाड झाल्याने बरीच गावे अंधारात राहत असल्याने नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचारी यांना एकत्रित मिळून सदर उच्चदाब वाहिनी वरील बिघाड काढून चालू करणेबाबत प्रभारी शाखा अभियंता, सांगाव यानी आदेश दिले होते.

(३) उक्त प्रकरणी विद्युत निरिक्षक, मिरजमार्फत चौकशी केली असून, संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचा खुलासा मागविण्यात आला आहे.
(४) नियमानुसार संबधित कंत्राटदाराद्वारे सदर मृत कंत्राटी कर्मचाऱ्याचे कुटुंबियास आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) येथील रुक्मिणीबाई हॉस्पिटलमध्ये डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांअभावी सोयीसुविधा मिळत नसल्याबाबत**

**(२१) १२५४९ (०६-०८-२०२०). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रुक्मिणीबाई हॉस्पिटलमध्ये तज्ञ डॉक्टर्स, पुरेसा कर्मचारी वर्ग तसेच तेथे येणाऱ्या रुग्णांना अपुऱ्या सोयीसुविधा असल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण शहरात कोणतेही शासकीय रुग्णालय नसल्याने त्या लगतच्या कसारा, शहापूर, मुरबाड, उल्हासनगर, अंबरनाथ व इतर ग्रामीण भागातील तसेच कल्याण हे रेल्वे जंक्शन असल्याने रेल्वे अपघात रुग्णांना उपचारासाठी दाखल केल्या जाणाऱ्या अपघातग्रस्त रुग्णांना तेथे डॉक्टर्स उपलब्ध नसल्याने औषधोपचार केले जात नसल्याचेही त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुक्मिणीबाई हॉस्पिटमध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात यावा असे निवेदन पत्र मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१९ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास मा.प्रधान सचिव, सार्व.आरोग्य विभाग, मंत्रालय तसेच मा.सार्व.आरोग्य मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रुक्मिणीबाई हॉस्पिटलमध्ये तज्ञ डॉक्टर्स, पुरेसा कर्मचारी वर्ग तसेच तेथे येणाऱ्या रुग्णांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या बाई रूक्मिणीबाई रूग्णालय, कल्याण येथे उपलब्ध मनुष्यबळानुसार सर्व आरोग्य विषयक सोयीसुविधा सुरळीतपणे सुरू आहेत.
(२), (३) व (४) कसारा, शहापूर, मुरबाड, उल्हासनगर, अंबरनाथ व इतर ग्रामीण भागातील तसेच कल्याण रेल्वे जंक्शन असल्याने रेल्वे अपघात झालेल्यांना महानगरपालिकेच्या रूग्णालयात उपलब्ध तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रूग्णांवर उपचार केले जातात.
• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हॉस्पीटलमध्ये पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध होणेकरीता मा.लोकप्रतिनिधींची निवेदने प्राप्त होतात, ही वस्तुस्थिती आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील रूग्णालये/नागरी आरोग्य केंद्रांकरीता वैद्यकीय संवर्गात सद्यस्थितीत एकूण ११५ मंजूर पदांपैकी ४६ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

• अतितातडीच्या प्रसंगी I.C.U., N. I.C.U. व सिटी स्कॅन इत्यादीची आवश्यकता भासल्यास रूग्णास प्रथमोपचार देवून मुंबई व ठाणे येथे उपचारासाठी पाठविण्यात येते.

• रूग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना महावितरण आपल्या दारी या योजनेद्वारे वीज जोडणी देण्याबाबत**

**(२२) १२६२० (१३-०९-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आकडा टाकून वीज घेण्याऱ्या शेतक-यांसाठी सन २०११ मध्ये महावितरण आपल्या दारी ही योजना जाहीर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण आपल्या दारी या योजनेअंतर्गत मराठवाड्यात ४७ हजार शेतकऱ्यांनी शपथपत्र देवून कोटेशन भरले असुनही यापैकी केवळ १० हजार शेतकऱ्यांना आजपर्यंत विजजोडणी देण्यात आली असून ३७ हजार शेतकरी अजुनही विज जोडणीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना उच्चदाब वाहिनी व रोहित्र न वापरता केवळ नावापुरती जोडणी दिली गेली असुन त्यांना विजेची देयकही दिली गेली असल्याने, त्या शेतकऱ्यांची नावे प्रतिक्षा यादीतुन कमी झाली आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विज जोडणी दिल्याने रोहित्र न वापरता केवळ वीज देयक दिले जात असल्याने शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत मराठवाडयातील सर्व ४८,१७५ शेतकऱ्यांना केबलद्वारे विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे.

(३) हे खरे आहे. महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत ४८,१७५ शेतकऱ्यांना केबलद्वारे विद्युत पुरवठा देण्यात आला असल्याने सदर शेतकऱ्याची नावे प्रतिक्षा यादीतून कमी झाली आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विशेषत: सातारा जिल्ह्यातील महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत**

**(२३) १२६६० (१७-०८-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सातारा जिल्ह्यातील महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु.५० हजार सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ३१ मार्च पुर्वी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले नसल्याची बाब दिनांक १५ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१४-१०-२०२१) :** (१) अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणा-या खातेदारांना योग्य समर्पक योजनेद्वारे दिलासा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण (जि. रायगड) मुख्य कार्यालय व पाण दिवे कार्यालयाकडून नवीन वीज जोडणी देण्याबाबत होत असलेली दिरंगाई**

**(२४) १२७४७ (२२-०९-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागेल त्याला वीज आणि ते देखील आठ दिवसांच्या आत असा नियम असतानाही उरण च्या पूर्व (जिल्हा रायगड) भागातील वीज ग्राहक मात्र महावितरणाच्या गलथान कारभारामुळे त्रस्त झाले असून याबाबत उरण मुख्य कार्यालय व पाण दिवे कार्यालयाकडून नवीन वीज जोडणी देण्याबाबत दिरंगाई होत असल्याने नव्याने घर घेतलेल्यांना मात्र महावितरणाचा सदोष कारभाराचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरणच्या पूर्वभागातील विज संदर्भात मागणी अर्ज स्वीकारणाऱ्या पान दिवे येथील कार्यालयात तब्बल ५० वीज मीटर साठी चे अर्ज प्रलंबित आहेत मात्र या कार्यालयाकडून त्यांचेकडे वीज मीटर उपलब्ध नाही अशी कारणे दिली जात आहे हे ही खरे आहे काय,

(३) असलास, उक्त प्रकरणी उरण वीज मंडळाचे प्रभारी अधिकारी राठोड यांच्याशी ग्राहकांनी संपर्क साधला असता पान दिवे कार्यालयाकडे वीज मीटर उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, ग्राहकांना वीज जोडणी देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही. भांडूप परिमंडळाअंतर्गत असलेले वाशी मंडळातील पनवेल (शहर) विभागाअंतर्गत येणाऱ्या उरण उपविभागामार्फत उरण तालुक्यातील वीज वितरण यंत्रणा देखभाल दुरुस्ती व नवीन वीज जोडण्या देण्याचे कामकाज महावितरणकडून करंजा, जसकार, जासई, चिरनेर, कोप्रोली व उरण (शहर) शाखा कार्यालयाद्वारे पार पाडले जाते. त्यापैकी कोप्रोली शाखा कार्यालय इमारत ही पाणदिवे या ठिकाणी स्थित आहे.

वीज जोडण्या देण्याकरिता मा. वीज नियामक आयोगाने संहिता ठरवून दिलेल्या आहेत. त्यानुसार परिपूर्ण अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून अर्जदाराच्या जागेची तपासणी पूर्ण करण्याचा कालावधी हा शहरी भागात ७ दिवस आहे. अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून अर्जदाराने भरावयाच्या निर्धारित शुल्काबाबत (वीज जोडणी आकार सुरक्षा ठेव इत्यादी) कळविण्याचा कालावधी हा शहरी भागात १५ दिवस आहे. परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यापासून आणि निर्धारित आकारांचा भरणा केल्यानंतर, अस्तित्वात असलेल्या विद्युत जाळयातून वीज पुरवठा करावयाचा असल्यास १ महिन्यात वीज देण्याचे बंधन आहे. सदर संहितेचे पालन व्हावे म्हणून महावितरण कंपनीने SAP प्रणाली विकसित केली असून पैसे भरुन प्रलंबित असलेल्या वीज मागणी अर्जांचा आढावा वरिष्ठांकडून नियमितपणे घेतला जातो व पुरेसे वीज मीटर संबंधित अभियंता/शाखा कार्यालय यांना वर्ग करणेत येतात.
(२) हे खरे नाही. महावितरण कंपनीच्या कोप्रोली शाखा कार्यालयात दिनांक ३१.१०.२०२० अखेरपर्यंत पैसे भरुन वीज जोडणीसाठी ३० दिवसांपेक्षा कमी कालावधीसाठी प्रलंबित असणाऱ्या अर्जांची संख्या एकूण ११ इतकी होती व त्यासाठीची एकूण १४ सिंगल फेज मीटर उपलब्ध होते.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) कोप्रोली शाखा, मु.पाणदिवे व उरण उपविभाग अंतर्गत दिनांक ३१.१०.२०२० रोजी ३० दिवसांपेक्षा जास्त पेड पेंडिग ग्राहकाची यादी निरंक आहे. वीज जोडणी देण्याची कार्यवाही विहित मुदतीत होत असल्याने संबंधितांवर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

### गोंदिया जिल्हयातील नवेगांव, नागझीरा कोअर झोन मध्ये होत असलेली अवैध वृक्षतोड

**(२५) १२७५८ (१५-०९-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना महामारीच्या काळात नवेगांव, नागझीरा कोअर झोन मध्ये अवैधरित्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंपाटमेंट क्रमांक ९६,९७,९८,१०९,११०,१२०,१२१,१२६ या मध्ये ५०० हुन अधिक झाडे मशिन व जेसीबी द्वारे वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने कापण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानीक संघटनांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वनविभागाने सदर प्रकरणी चौकशी करुन संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (१३-१०-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रस्तुत प्रकरणी श्री. सचिन रंगारी, अध्यक्ष, पिपल फॉर ॲनीमल, साकोली युनिट यांनी दिनांक ०१.०६.२०२० रोजी मा. श्रीमती मेनका गांधी, राष्ट्रीय अध्यक्ष, पिपल फॉर ॲनीमल, इंडीया यांना उदेशून पत्र लिहील्याचे निदर्शनास आले आहे.
(४) उक्त प्रकरणी उपसंचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, साकोली तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर यांनी केलेल्या चौकशी दरम्यान अवैध वृक्षतोड झाली असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तदनंतर शासनास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालामध्ये देखील अवैधवृक्षतोडीच्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही

---

**राज्य महावितरण आर्थिक संकट असल्याबाबत**

**(२६) १३५०२ (२४-०९-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना साथीमुळे राज्यात जाहीर झालेल्या लॉकडाऊन च्या परिस्थितीत महावितरणने ग्राहकांना उत्तम व अविरत सेवा देऊन या अडचणींच्या काळात वीज देयकांच्या भरणा खूपच अल्प झाल्यामुळे, महावितरण आर्थिक संकटात सापडल्याने आर्थिक मदतीसाठी केंद्र शासनाकडे १० हजार कोटी रुपयांच्या निधीच्या मागणी माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाकडून किती निधी प्राप्त झाला आहे,
(३) तसेच महावितरण आर्थिक संकटातून बाहेर येण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. नितिन राऊत (१८-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाकडून अद्याप निधी प्राप्त झालेला नाही.
(३) महावितरण कंपनी आर्थिक संकटातून बाहेर येण्यासाठी थकबाकी वसुली मोहिमेद्वारे महसूल वाढीसाठी प्रयत्नशील आहे. वीज ग्राहकांना मेलद्वारे Online वीजदेयके पाठवून Net Banking/Mobile Apps/Maha Online/BBPS/ Maha Power pay etc. वीज बील देयके अदा करण्यास प्रवृत्त करण्यात येत आहे. तसेच महावितरण कंपनीत होणाऱ्या प्रशासकीय व इतर खर्चात काटकसर करण्यात येऊन खर्चाची बचत करण्यात येत आहे. याशिवाय कृषीपंप वीज जोडणी धोरणांतर्गत थकबाकी वसुलीची मोहिम, वसुलीकरिता प्रोत्साहन, देण्यात येणाऱ्या कर्जास शासनाची हमी हे उपाययोजना करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टाळेबंदीच्या काळामधील नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(२७) १४४१२ (११-०९-२०२०). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने नुकतेच २० लाख कोटींचे पॅकेज जाहीर केले असून आधीच्या १ लाख ७० हजार कोटींच्या पॅकेज मधून जनधन खात्यात मदत, उज्वला योजनेतून ३ महिने मोफत गॅस, निराधारांना अतिरिक्त मानधन, मध्यमवर्गीयांना ६ महिने कर्जाच्या हफ्यातून मुक्तता इत्यादी अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाळेबंदीच्या काळामध्ये वाजंत्री (बँड पथक) व्यावसायिक, मंडप व्यावसायिक, सलून व्यावसायिक, शेतमजूर, रोजंदारी कामगार, रिक्षा चालक, टॅक्सी चालक इत्यादींना गेल्या ३ महिन्यात शासनाने कोणतीही आर्थिक मदत केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरजूंना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१४-१०-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) राज्यातील विविध आर्थिक दुर्बल घटकांकरिता राज्य शासनाने दि.१३.०४.२०२१ रोजी आर्थिक पॅकेज जाहीर केले आहे. राज्यातील परवानाधारक रिक्षाचालक, सक्रिय नोंदणीकृत घरेलू कामगार, सक्रिय नोंदणीकृत बांधकाम मजूर, अधिकृत फेरीवाले व पथविक्रेते यांना राज्य शासनाकडून अर्थसहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये मोफत "शिवभोजन थाळी", प्रतिव्यक्ति ३ किलो गहू व २ किलो तांदूळ मोफत, इत्यादी बाबींचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**भिवंडी (पूर्व) (जि.ठाणे) येथील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ५ रस्त्यांची कामे प्राधान्यक्रमाने मंजूर करून निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२८) २०२८४ (२५-१२-२०२०). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (पूर्व) (जि.ठाणे) येथील नागरिकांना न्याय देण्याच्या दृष्टीने भिवंडीतील सर्व ५२ रस्त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी उर्वरीत १४ रस्त्यांना मंजुरी व निधी उपलब्ध करणे तसेच त्यातील ५ रस्त्यांची कामे प्राधान्याने मंजूर करून काम सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहरामध्ये एम.एम.आर.डी.ए.मार्फत एकूण ५२ रस्ते बनविण्यात येणार आहेत त्यातील केवळ ३८ रस्त्यांनाच मंजुरी मिळाली असून भिवंडी (पूर्व) भागाकडे पूर्णतः दुर्लक्ष झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)  असल्यास, ३८ पैकी १५ रस्ते एम.एम.आर.डी.ए., ९ रस्ते सार्वजनिक बांधकाम आणि १४ रस्ते भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत बनविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भिवंडी (पूर्व) येथील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात ५ रस्त्यांची कामे प्राधान्यक्रमाने मंजूर करून निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.  भिवंडी-निजामपूर शहर हद्दीतील वाहतूक कोंडी कमी करण्याच्यादृष्टीने एकूण ५२ पैकी ३८ रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाची कामे विस्तारीत मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांगर्तगत मंजूर करण्यात आली आहेत.  त्यापैकी १५ रस्त्यांची कामे (एकूण लांबी १८.५० कि.मी.) एमएमआरडीएमार्फत हाती घेण्यात आली आहेत.  रु. ५ कोटी खर्चाच्या खालील २० व त्यावरील खर्चाची ३ अशा एकूण २३ रस्त्यांची कामे पुढील खर्चाच्या कार्यवाहीस्तव एमएमआरडीएमार्फत भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहेत.  तथापि, महानगरपालिकेच्या विनंतीनुसार उक्त २० रस्त्यांच्या कामांपैकी ९ कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.  उक्त ९ रस्त्यांपैकी ३ रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून, ४ रस्त्यांची कामे निविदा स्तरावर व २ रस्त्यांचे कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०२० मधील निवेदनान्वये ५ नविन रस्त्यांची कामे प्रस्तावित केली आहेत.  लोकप्रतिनिधींकडून मागणी केलेल्या कामांना विस्तारीत मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांतर्गत प्रशासकीय मान्यता देणेकरीता प्रस्ताव वेळोवेळी मा. अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात येतात.  त्याप्रमाणे कार्यवाही सुरु असून प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर जागेची व निधीची उपलब्धता तपासून प्राधान्यक्रमाने सदर कामे हाती घेण्याचे प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

---

### भिवंडी शहरात (जि.ठाणे) मेट्रो-५ च्या कामामुळे विविध समस्या निर्माण झाल्याबाबत

**(२९) २०२९१ (०७-०१-२०२१).  श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर विकास प्राधिकरणाद्वारे मेट्रो ५ प्रकल्पाचा मार्ग निश्चित करणे, प्रकल्पाच्या कामादरम्यान नागरिकांच्या होणाऱ्या नुकसानाची भरपाई बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये मिळणाऱ्या नुकसान भरपाईच्या धोरणात्मक धर्तीवर मिळणे तसेच भिवंडीमध्ये लास्ट माईल कनेक्टिव्हिटीच्या उद्देशाने परिवहन विभागाद्वारे वाहतूक व्यवस्था सुरू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी (जि.ठाणे) शहरामध्ये मुंबई महानगर विकास प्राधिकरणाद्वारे पायाभूत सुविधांची कामे सुरू असून मेट्रो ५ प्रकल्पाचे काम मार्ग निश्चित न झाल्याने अद्याप सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिवंडी शहरातील रस्ते छोटे असल्याने वाहतुकीची समस्या निर्माण होऊन नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार मेट्रो ५ प्रकल्पाचा मार्ग निश्चित करणे व प्रकल्पादरम्यान नागरिकांच्या होणाऱ्या नुकसानाची भरपाई बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये मिळणाऱ्या नुकसान भरपाईच्या धर्तीवर मिळणे तसेच भिवंडीमध्ये लास्ट माईल कनेक्टिव्हिटीच्या उद्देशाने मुंबई महानगर विकास प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक व्यवस्था सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) मेट्रो मार्गिका-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) प्रकल्पांतर्गत टप्पा १ (ठाणे ते भिवंडी) दरम्यान च्या कामास सुरुवात करण्यात आली असून टप्पा-२ (भिवंडी ते कल्याण) दरम्यानच्या मार्गिकेची व्यवहार्यता तपासणी करुन सदरचा अहवाल पूर्ण झाल्यानंतर स्थापत्य कामास प्रारंभ करण्याचे एमएमआरडीच्या स्तरावर नियोजित आहे.

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात मेट्रो मार्गिका-५ चे टप्पा-१ चे काम सुरु असून सदर कामामुळे होणारी वाहतूक कोंडीची समस्या कमीत कमी व्हावी या दृष्टीकोनातून संबंधित कंत्राटदारामार्फत वाहतूक मार्शल पुरवले जात आहेत.

मेट्रो मार्ग-५ (ठाणे-भिवंडी-कल्याण) प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या विस्तारीत (Extension) मार्गाची व्यवहार्यता तपासणी करीता डी.एम.आर.सी. यांची नेमणूक करण्यात आली असून सदरचा अहवाल पूर्ण झाल्यावर प्रकल्पाचा (टप्पा-२) मार्ग निश्चित करण्यात येईल. सदर मेट्रो प्रकल्पांतर्गतच्या प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन “मुंबई नागरी परिवहन प्रकल्प पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण” नुसार करण्यात येणार आहे. भिवंडी शहरात आतील भागांमध्ये नागरिकांना वाहतुकीची व्यवस्था निर्माण व्हावी तसेच अगदी शेवटच्या अंतरापर्यंत वाहतूक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून प्रादेशिक परिवहन विभाग व एमएमआरडीए च्या संयुक्त विद्यमाने बसेसची सुविधा उपलब्ध करण्याबाबत प्रकल्पाच्या संकलनादरम्यान कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील १८ गावांची दस्तावेज नोंदणी बंद असल्याबाबत..**

**(३०) २०३०३ (०६-०१-२०२१). ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील घेसर, उमरोली, व्दारली, वसार, नांदीवली (अंबरनाथ), दावडी,पिसवली, निळजे, सोनारपाडा, हेदुसने, भाल, माणेरे, आशेले, अडवली, चिंचपाडा, गोलीवली, मानगाव, कोले या १८ गावांची मागील २ वर्षापासून दस्तावेज नोंदणी बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दस्तावेज नोंदणी बंद असल्यामुळे सामान्य नागरिकांना बँक व फायनान्सचे गृहकर्ज घेणे अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सदर दस्तावेज नोंदणी लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (२७-०९-२०२१) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही, प्रश्नामध्ये नमुद गावांमधील स्थावर मिळकतीबाबतच्या दस्तांची भारतीय नोंदणी अधिनियम १९०८ व महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ च्या नियमांमधील तरतुदींनुसार नोंदणी केली जाते. महाराष्ट्र नोंदणी नियम ४४ च्या उप-नियम (१) मध्ये दस्त नोंदणी करण्याकरीता सादर केलेल्या दस्तांची नोंदणी करण्यापूर्वी संबंधित दुय्यम निबंधकांनी कोणत्या बाबी तपासाव्यात याबाबत उहापोह करण्यात आला आहे.

तसेच, उक्त नियमानुसार संबंधित दुय्यम निबंधक यांना त्यांचेसमोर नोंदणीसाठी सादर करण्यात आलेल्या दस्तातील व्यवहार हा केंद्र किंवा राज्याच्या कोणत्याही कायदयातील तरतुदींनुसार प्रतिबंधित असल्यास संबंधित कायदयातील सक्षम प्राधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र असल्यास असा दस्त नोंदणीसाठी स्विकारता येतो. तसेच, दस्तामध्ये नमुद मालमत्तेची वैधता ठरविण्याचे अधिकार नोंदणी अधिनियमाच्या तरतूदीनुसार संबंधित दुय्यम निबंधकांना नाहीत.

नोंदणी अधिनियम, नोंदणी नियम व महाराष्ट्र मुद्रांक कायदा तसेच इतर अनुषंगिक केंद्र व राज्यशासनाच्या कायदे व नियमांतील तरतुदींची पूर्तता करणाऱ्या स्थावर मिळकतीबाबतच्या दस्तांची प्रश्नामध्ये नमुद गावांमध्ये नियमानुसार नियमितपणे नोंदणी करण्यात येत आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नोंदणीकृत बांधकाम कामगारांना पाच हजार रुपये अर्थसहाय्य देण्याची योजना सुरु करण्याबाबत**

**(३१) २०३७१ (२३-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी नोंदणी केलेल्या कामगारांना अवजारे व तत्सम साहित्य खरेदीसाठी इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळ यांच्या वतीने देण्यात येणारे पाच हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळांच्या बैठकीत घेण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना मिळणारे अर्थसहाय्य बंद करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत अनेक कामगार संघटनानी लेखी निवेदन माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने नोंदणीकृत बांधकाम कामगारांना पाच हजार रुपये आर्थिक सहाय्य त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१३-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) नोंदणीकृत बांधकाम कामगारांना नोंदणीनंतर लगेच हत्यारे/अवजारे खरेदीकरीता रुपये ५०००/- देण्याची योजना दिनांक १४.०८.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये बंद करण्याचा निर्णय झालेला आहे. सदर योजना पुन्हा सुरु करणेबाबतची बाब सद्यस्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून बांधकाम कामगारांना असलेल्या कल्याणकारी योजनेचा लाभ मिळणेबाबत

**(३२) २०३७२ (०६-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील बांधकाम कामगारांची ऑनलाईन नोंदणी झाली तरी अद्याप कोणत्याही कामगाराला नोंदणी स्मार्ट कार्ड मिळाले नाही, तसेच नाका कामगारांसाठी सुरू असलेली अटल आहार योजना शहरातील केवळ काही खाजगी बांधकाम प्रकल्पांवर कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच, १६ मार्च, २०२० ते २३ मार्च, २०२० च्या दरम्यान कामगार उपायुक्त कार्यालयात हजारो बांधकाम कामगार मजुरांची आरोग्य तपासणी करण्यात येऊन सदर तपासणीचे प्रत्येकी कामगार रुपये १९५० ते मंडळातर्फे या संस्थेला अदा करण्यात आले असून, सदर एच. एल. एल या संस्थेने आरोग्य तपासणीचा रिपोर्ट आठ महिने नंतर ही बांधकाम कामगार मजूरांना उपलब्ध करून देण्यास असमर्थ ठरले आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आणि स्किल डेव्हलपमेंट संस्थेद्वारे जवळपास ८०० कामगारांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात आले असून अद्यापही सदर प्रशिक्षणार्थी कामगारांना प्रशिक्षणाचे अनुदान व प्रशिक्षणाचे प्रशस्तिपत्र अद्यापही मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) तसेच, बांधकाम कामगारांना अवजारे खरेदी करण्यासाठी मिळणारे अनुदान रुपये ५००० योजना शासनाच्या वतीने बंद करण्यात आली आहे काय, तसेच, नोंदणीकृत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व आवश्यक संच वितरण करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच, कोरोना लॉकडाऊनच्या काळात जाहीर करूनही हजारो बांधकाम कामगारांच्या खात्यात अद्यापही निधी जमा झालेला नसल्याने सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करून अहवाल तयार करण्यात आला आहे काय,
(६) तसेच बांधकाम कामगारांच्या पाल्यास मिळणारा शैक्षणिक लाभ, महिलांना मिळणारा प्रसूती लाभ, मृत बांधकाम कामगारांच्या वारसांना अंत्यविधी अर्थ सहाय्य योजना, या लाभांपासून वंचित राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, बांधकाम कामगार

सेना महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने पुणे जिल्हा कामगार आयुक्त कार्यालयाच्या आडमुठ्या व निष्क्रिय कारभारा विरोधात अप्पर कामगार आयुक्त कार्यालय पुणे यांना निवेदन देऊन आंदोलन करण्याचा इशारा बांधकाम कामगार इमारत व बांधकाम कामगार मंडळाच्या वतीने देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(७) असल्यास, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कडून मिळणारे लाभ कामगारांना पुणे विभागात देण्याबाबत येणाऱ्या अडचणी सोडविण्याबरोबरच कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्याकरिता पुणे येथे बैठकीचे आयोजन करणेबाबत चिंचवड वि.स.स यांनी लेखी दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे का?

(८) असल्यास, उक्त प्रकरणी कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत असून याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही. पुणे जिल्हयातील ६४७७ बांधकाम कामगार लाभार्थ्यांना ओळखपत्राचे वाटप करण्यात आले आहे. टाळेबंदीमुळे पुणे जिल्हयातील १७९ बांधकाम साईटवर अडकून पडलेल्या २२२७३ बांधकाम कामगारांना अटल आहार योजनेद्वारे भोजन देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही. कामगार उपायुक्त, पुणे या कार्यालयामार्फत नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांपैकी ६९२२ कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून आरोग्य तपासणीचे देयक प्रती कामगार रु.१९५०/- या मंजूर दराप्रमाणे अदा करण्यात आलेले आहे.

कामगार उपायुक्त कार्यालय, पुणे जिल्हा, पुणे कार्यालयामार्फत मे. एच. एल. एल. लाईफकेअर प्रा. लि. या संस्थेमार्फत आरोग्य तपासणी केल्यानंतर त्यांच्या तपासणी अहवालाची प्रत बांधकाम कामगारांना देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही. पुणे जिल्हयांतर्गत ११६४ बांधकाम कामगार लाभार्थ्यांना कौशल्य विकास वृध्दीकरण योजनेंतर्गत प्रशिक्षण व प्रशस्तीपत्र देण्यात आलेले आहे. या ११६४ प्रशिक्षित बांधकाम कामगार लाभार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आलेले आहे. कौशल्य विकास वृध्दीकरण प्रशिक्षणार्थ्यांकरिता बांधकाम कामगार लाभार्थ्यांना अनुदानाऐवजी प्रशिक्षणाच्या दरम्यान कामाच्या तासाचे झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई देण्यात येते अशी व्यवस्था आहे.

(४) शासनाच्या दि.१४.०८.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये नोंदीत बांधकाम कामगारांना नोंदणीनंतर हत्यारे/अवजारे खरेदीकरीता रु.५०००/- चे अर्थसहाय्य देण्याची योजना बंद करण्यात आली आहे. तसेच, नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांना १२,४४,९८० सुरक्षा संच व १२,५४,९२६ अत्यावश्यक वस्तू संचाचे वाटप करण्यात आलेले आहे.

(५) कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावामुळे जाहिर करण्यात आलेल्या टाळेबंदीमध्ये पहिल्या टप्प्यात प्रत्येकी रु. २०००/- व दुसऱ्या टप्प्यात रु. ३०००/- असे एकूण रु.५०००/- प्रमाणे १०,०४,६९९ बांधकाम कामगारांना अर्थसहाय्य थेट बँक बचत खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात आले आहे. कोविड-१९ च्या दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी जाहिर करण्यात आलेल्या कडक निर्बंधामध्ये ११,७८,५७४ इतक्या बांधकाम कामगार लाभार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/- प्रमाणे अर्थसहाय्य थेट बँक बचत खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात आले आहे.

(६) हे खरे आहे. बांधकाम कामगार सेना महाराष्ट्र प्रदेश संघटनेतर्फे दि.७ ऑक्टोबर,२०२० रोजी निवेदन सादर करण्यात आले होते. पुणे जिल्हयांतील मंडळांमार्फत शैक्षणिक लाभ, प्रसूती लाभ व अंत्यविधी या योजनेद्वारे ६६३७ नोंदित बांधकाम कामगारांना रु. ७,९९,६७,८२०/- इतक्या रकमेचा लाभ देण्यात आलेला आहे.
(७) हे खरे नाही.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

---

**३३/११ के.व्ही पोहेगाव वाहिनीवर ३३/११ के.व्ही फिडरवरील लोड कमी करण्याबाबत**

**(३३) २७१२३ (०६-०५-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील २२० के.व्ही उपकेंद्रातून पोहेगाव उपकेंद्रास ३३/११ के.व्ही व रांजणगांव उपकेंद्रास ३३/११ के.व्ही वीज पूरवठा करण्यात येत असल्याने सदर वाहिनीवर ३२० A इतका अतिभार निर्माण होत असल्याने फिडर वारंवार बंद होत असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाहिनीवरुन काकडी ते रांजणगांव पर्यंत ६ कि.मी लांबीची लाईन टाकल्यास रांजणगाव उपकेंद्रावरील अतिभार कमी होऊन २२० के.व्ही कोपरगांव उपकेंद्रावरील अतिभार कमी होण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वाहिनीवरुन काकडी ते रांजणगांव पर्यंत पर्यंत ६ कि.मी लांबीची लाईन टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे. अति मागणीचे कालावधीत ३३ के.व्ही पोहेगांव वाहिनीवरील महत्तम विद्युत भार हा ३२० Amp इतका असतो. त्यामुळे महत्तम मागणीच्या कालावधीत ३३ के.व्ही पोहेगांव वाहिनी (फिडर) काहीवेळेस अतिभारामुळे बंद होतो.
(२) हे अंशत: खरे आहे. सर्वेक्षणानुसार काकडी ते रांजणगावपर्यंत ९ कि.मी. लांबीची लाईन टाकल्यास ३३ के.व्ही पोहेगाव वाहिनीवरील अतिभार कमी होण्यास मदत होईल.
(३) ३३/११ के.व्ही पोहेगाव व ३३/११ के.व्ही रांजणगाव उपकेंद्रात होणारा वीज पुरवठा सुरळीत व सक्षम करणेकरिता ३३ के.व्ही पोहेगांव वाहिनीवरील सद्यस्थितीत जोडलेले ३३/११ रांजणगाव उपकेंद्र हे २२०/३३ के.व्ही बाभळेश्वर उपकेंद्रातून निघणाऱ्या ३३ के.व्ही. काकडी वाहिनीवर जोडण्याचे काम कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत प्राप्त होणाऱ्या कृषी सुविधा निधीच्या (ACF) मर्यादेत निधी उपलब्धतेनुसार करण्याचे विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील शेतकऱ्यांची कृषिप्रधान प्रा.लि या कंपनीने निकृष्ट प्रतीच्या सोयाबीन बियाणांची विक्री करून केलेली फसवणूक

**(३४) २७२९८ (०९-०६-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील कृषिप्रधान प्रा.लि, जि.जालना (मुख्य कार्यालय सेनापती बापट रस्ता, पुणे) या कंपनीने शेतकऱ्यांना निकृष्ट प्रतीच्या सोयाबीन बियाणांची विक्री करून फसवणूक केल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील ३२ शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने शेतकऱ्यांना निकृष्ट प्रतीच्या सोयाबीन बियाणांची विक्री करणाऱ्या कृषिप्रधान प्रा.लि. कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१४-१०-२०२१) :** (१) व (२) पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यामध्ये सोयाबीन बियाणाच्या एकुण ९० तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकि कृषिधन सीड्स प्रा.लि.जालना या कंपनीने उत्पादित केलेल्या सोयाबीन पिकाच्या संशोधित वाण केएसएल ४४१ या वाणाच्या ५८ शेतकऱ्यांनी तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीकडे तक्रार दाखल केली होती.

(३) व (४) सदर सर्व तक्रारींची तालुकस्तरीय तक्रार निवारण समितीमार्फत प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सर्व तक्रारींमध्ये कंपनीने पुरवठा केलेले बियाणे उगवण क्षमतेमध्ये निकृष्ट दर्जाचे आढळून आले. ५८ शेतकऱ्यांपैकी २८ शेतकऱ्यांना मे.कृषिधन प्रा.लि.जालना या कंपनीमार्फत ९.५ क्विंटल बियाण्यांचे फेर वाटप करण्यात आले.

बियाणे कायदा १९६६ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मध्ये नुकसान भरपाईची तरतुद नसल्याने उर्वरीत ३० शेतकऱ्यांना तालुकास्तरीय तक्रारी निवारण समितीने पंचनाम्याचे अहवाल देऊन त्याना ग्राहक मंचाकडे दाद मागणे संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले आहे. कृषिधन प्रा.लि. कंपनीने उत्पादीत केलेल्या सोयाबीन बियाणांचा के.एस.एल. ४४१ वाणाचे लॉट नं.शासकीय बीज परिक्षण प्रयोगशाळा, पुणे येथे तपासणीस पाठविले असता सदर नमुने अप्रमाणीत घोषित झाल्याने न्यायालयीन दावा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच भा.द.वि. कलम ४२० अन्वये आळेफाटा पोलीस स्टेशन, जुन्नर, पुणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**चंद्रपूर शहरातील गणेश एजन्सी प्लॉट येथे धाड टाकुन कापसाचे (एचटीबीटी) बनावट बियाणे जप्त केल्याबाबत**

**(३५) २७३५७ (०९-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील गणेश एजन्सी प्लॉट येथे कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकाने धाड टाकुन कापसाचे (एचटीबीटी) ७० लक्ष रुपयांचे बनावट बियाणे दिनांक ६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास जप्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने संबंधित दोषींविरध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१४-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) चंद्रपूर शहरातील गणेश एजन्सी प्लॉट, शहीद विजय कुमरे चौक, समता चौक, येथे भाड्याने घेतलेल्या रुममध्ये अनधिकृत एच.टी.बी.टी.कापूस बियाणांचा साठा असल्याच्या मिळालेल्या माहिती वरुन कृषि विभाग व पोलीस यांच्या समन्वयाने धाड टाकून अनधिकृत एच.टी.बी.टी. कापूस बियाणांची १६०० पाकीटे तसेच ३३२० किलो खुले बियाणांचा साठा दिनांक ०१.०५.२०२१ रोजी जप्त करण्यात आलेला आहे. या संदर्भात चंद्रपूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा क्रमांक ०२७१/२१ दिनांक ०२.०५.२०२१ रोजी दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या बियाण्यांचे नमुने शासकीय बीजपरिक्षण शाळा नागपूर येथे तपासणीस पाठविण्यात आले होते. तपासणी अंती बियाण्यांचे सर्व नमुन्यांमध्ये एच.टी.बी.टी.जीन असल्याचे अहवाल प्राप्त झाले आहेत. या प्रकरणी पुढील तपास गृह विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापुर (जि.बुलढाणा) येथील नुकसानग्रस्त सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(३६) २७४९४ (०९-०६-२०२१). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापुर (जि.बुलढाणा) येथील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना खरीप हंगामात बनावट सोयाबीन कंपन्यांच्या निकृष्ट दर्जाच्या बियाणांमुळे दुबार पेरणी करावी लागली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात संबंधित प्रशासकीय यंत्रणेने कोरोनाचे निमित्त करुन कागदोपत्री पंचनामे निकषात बसत नसल्याचे दाखवून निकृष्ट दर्जाची सोयाबीन बियाणे निर्माण करणाऱ्या संबंधित कंपन्यांना पाठीशी घातल्याची बाब आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने संबंधित बनावट कंपन्यांवर कारवाई करण्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (१४-१०-२०२१) :** (१) खरीप हंगाम २०२० मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, मतदार क्षेत्रातील शेतकऱ्यांचा निकृष्ट सोयाबीन बियाणांबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.

(२) हे खरे नाही,

(३) खरीप हंगाम २०२० मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर मतदार क्षेत्रातील मलकापूर व नांदूरा, या तालुक्यातील सदोष बियाणांच्या प्राप्त झालेल्या एकूण ४०८ तक्रारींचे पंचनामे करण्यात आलेले आहेत. प्राप्त तक्रारीनुसार तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती मार्फत क्षेत्रीय तपासणी करुन तपासणीचे अहवाल संबंधीत शेतकऱ्यांना देण्यात आले आहे. तसेच बियाणे कायद्यांतर्गत नुकसान भरपाईची तरतुद नसल्याने संबंधीताना नुकसान भरपाई मिळण्यासाठी ग्राहक मंचामध्ये जाण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(४) बियाणे सदोष असल्याबाबतचा समितीचा निष्कर्ष आहे. अशा सर्व प्रकरणामध्ये बियाणे निरीक्षकांनी बियाणे कायदा १९६८ अंतर्गत कार्यवाही करुन ३ सोयाबीन उत्पादक कंपन्यावर पोलीस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच कोर्ट केस पात्र १५ अप्रमाणीत नमुन्यावर न्यायालयीन दावे दाखल करण्यात आलेले आहेत. सोयाबीन उगवण न झालेल्या मलकापूर तालुक्यातील संबंधीत बियाणे कंपन्यांनी पंचनाम्याच्या आधारे ३५ शेतकऱ्यांना रु.२,२९,२००/- रोख स्वरुपात व ४ शेतकऱ्यांना १.२० क्विंटल बियाणे स्वरुपात तसेच नांदुरा तालुक्यातील ५३ शेतकऱ्यांना रू. २,१३,३००/- रोख स्वरुपात व ४८ शेतकऱ्यांना ५१.६० क्विंटल बियाणे स्वरुपात अशी एकूण १४० शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नालासोपारा (जि.पालघर) येथील एका खासगी रुग्णालयामध्ये ऑक्सिजनची गळती झाल्याने रुग्णाचा झालेला मृत्यू

**(३७) २७६०१ (१८-०६-२०२१). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि.पालघर) येथील एका खासगी रुग्णालयामध्ये ऑक्सिजनची गळती झाल्याने रुग्णाचा मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार होणाऱ्या ऑक्सिजन गळतीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णालयांतील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१०-२०२१) :** (१) वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विनायका रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातील ७ रुग्ण व रिध्दीविनायक रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातील ३ रुग्णांचा दिनांक १२.०४.२०२१ रोजी मृत्यू झाल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, सदर रुग्ण कोविडच्या अतिगंभीर परिस्थितीत असल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे. तसेच सदर रुग्णांच्या मृत्यूची वेगवेगळी वेळ, सदर रुग्णालयाची ऑक्सिजनबाबतची स्वयंपूर्णता व त्याच दिवशी घटनास्थळी महानगरपालिकेच्या पथकाने केलेली शहानिशा यावरुन सदर रुग्णांचा मृत्यू ऑक्सिजन कमतरतेमुळे झाला नसल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) वसई-विरार शहर महानगरपालिकेने विनायका रुग्णालय व रिध्दीविनायक रुग्णालयाच्या ऑक्सिजन पुरवठाबाबत खालील वस्तुस्थिती कळविली आहे :-

* उपरोक्त दोन्ही रुग्णालय ही खाजगी कोविड रुग्णालय आहेत.
* विनायका रुग्णालयास दिनांक ११.०४.२०२१ रोजी अधिकृत ऑक्सिजन पुरवठादारकडून १३९ जम्बो सिलेंडर व १ ड्युरा सिलेंडर ऑक्सिजन पुरवठा करण्यात आला होता.
* विनायका रुग्णालयाच्या तळ मजल्यावरच पुरवठादाराचे ऑक्सिजन डेपो स्थित आहे.
* तसेच रिध्दी विनायक रुग्णालयास खाजगी ऑक्सिजन पुरवठादाराकडून दिनांक ११.०४.२०२१ व दिनांक १२.०४.२०२१ या कालावधीत रुग्णालयाच्या मागणीनुसार ११० जम्बो सिलेंडर पुरविण्यात आले आहे. उपरोक्त रुग्णालयाचे स्वत:चे ऑक्सिजन जनरेशन प्लांट आहे.
* विनायका रुग्णालय व रिध्दीविनायक रुग्णालय ही दोन्ही रुग्णालये ऑक्सिजन स्वयंपूर्ण आहेत.

वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये कोविड रुग्णालयांना महानगरपालिकेने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या समन्वयाने खाजगी ऑक्सिजन पुरवठादारांकडून त्यांचे ऑक्सिजन प्लांट ताब्यात घेऊन आवश्यकतेनुसार नियमितपणे ऑक्सिजन पुरवठा करण्याचे धोरण अवलंबिले आहे. सदर पुरवठा सुरळीत रहावा याकरीता महानगरपालिकेमार्फत समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर परिसरातील समाज मंदिराच्या पुर्नबांधणीसाठी वापरण्यात येणाऱ्या दलित वस्ती निधीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३८) २७८२२ (१२-०६-२०२१). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर परिसरातील समाज मंदिराच्या पुर्नबांधणीसाठी वापरण्यात येणाऱ्या दलित वस्ती निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाज मंदिराच्या पुर्नबांधणी करीता कार्यादेश असताना त्याऐवजी ठेकेदाराने घोडबंदर गावात असलेल्या जुन्या मासळी मार्केटचा दुरुस्तीचा बनाव केला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित ठेकेदाराने समाज मंदिराचे कोणतेही काम न करता घोडबंदर गावातील जुने असलेले मासळी बाजाराचे फोटो लावून खोटे देयक देऊन समाज मंदिराच्या निधीचा पुर्नबांधणी केल्याचा बनाव करून दलित वस्तीमधील निधीत गैरव्यवहार केला असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-१०-२०२१) :** (१) व (२) मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत घोडबंदर येथील समाजमंदिराची पुर्नबांधणीचे काम घेण्यात आले होते.

समाज मंदिराची इमारत महापालिकेच्या प्रशासकीय कामासाठी उपयोगात असल्याकारणाने सदर इमारतीवर या योजनेतून खर्च करणे उचित होणार नाही, अशी बाब निदर्शनास आल्यानंतर पर्यायी जागेत म्हणजेच साईनाथ सेवानगर येथील जुने मच्छीमार्केट व व्यायामशाळेच्या ठिकाणी नुतनीकरण करुन समाजमंदिरासाठी निधी खर्च करण्यात आला आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी दाखल तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी चौकशी करुन जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे अहवाल सादर केलेला असून सदर प्रकरणात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कोरोना लॉकडाऊन कालावधीत आर्थिक नुकसान झालेल्या छोटया व्यापाऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देणेबाबत**

**(३९) २८२७८ (१५-०६-२०२१). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर असलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत राज्यातील उद्योग बंद अवस्थेत असल्याने छोटया व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच महिला उद्योजक व तरुण नवउद्योजक ज्यांनी नुकताच व्यवसाय सुरु केला होता अशा व्यावसायिकांनाही आर्थिक फटका बसला असून या वर्गाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत,

(३) असल्यास, राज्यातील लॉकडाऊन मुळे नुकसान झालेल्या छोटया व्यापाऱ्यांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबत ची मागणी होत असल्याने त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच राज्यातील उद्योग पूर्ववत होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-१०-२०२१) :** (१), (२), (३) व (४) देशात कोविड-१९ चा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र शासनाने दिनांक २५ मार्च, २०२० पासून देशभर लॉकडाऊन घोषित केला. सदर लॉकडाऊनची अंमलबजावणी करण्यासाठी अत्यावश्यक सेवा वगळून, राज्यातील उर्वरित सर्व उद्योग बंद करण्यात आले.
केंद्र शासनाने वेळोवेळी निदेशित केल्याप्रमाणे, राज्यातील लॉकडाऊनचे निर्बंध टप्प्याटप्प्याने कमी करण्यांत आले. तसेच कोविड नियमांचे पालन करुन, उद्योग सुरु करण्यास परवानगी देण्यात आली.

राज्यातील महिला उद्योजक व तरुण नवउद्योजक यांना प्रोत्साहन देण्याकरिता राज्य शासनातर्फे सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना राबविण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत उद्योग व सेवा उद्योग करिता अनुदान देण्याची योजना आहे. वरिल दोन्ही योजनेमध्ये युवक व युवतींना स्वत:चा उद्योग व सेवा उद्योग सुरु करण्याकरिता बँकांमार्फत कर्ज उपलब्ध करुन देण्यांत येते व शासनाकडून अनुदान देण्यात येते.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक :- साप्रोयो - २०२० / प्र.क्र.७३ / उद्योग-८, दिनांक ६ जुलै, २०२० अन्वये "उद्योग वाढीसाठी कोविड-१९ च्या पश्चात राज्य शासनामार्फत करण्यात येत असलेल्या उपाययोजना" जाहिर करण्यात आल्या आहेत.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक :- विअयो - २०१९ / प्र.क्र.१५ / उद्योग-१०, दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ अन्वये "महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१९ नुसार पुनरुज्जिवनक्षम नसलेल्या तसेच बंद उद्योग घटकांसाठी विशेष अभय योजना (Special Amnesty Scheme) राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेचा कार्यकाल दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत आहे.

---

### गोरेगाव पूर्व (मुंबई) येथील आरे दुग्ध वसाहतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घरात बेहिशोबी रोख रक्कम मिळाल्याबाबत

**(४०) २८४०९ (०९-०६-२०२१). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव पूर्व (मुंबई) येथील आरे दुग्ध वसाहती मधील घर दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यासाठी पन्नास हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी आरे दुग्ध वसाहतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी आरे दुग्ध वसाहतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घराची झडती घेतली असता त्यांच्या घरात ३ कोटी ४६ लाख १० हजार इतकी बेहिशोबी रोख रक्कम मिळाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-१०-२०२१)** :(१) गोरेगाव पूर्व (मुंबई) येथील आरे दुग्ध वसाहती मधील घर दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यासाठी पन्नास हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लोकसेवक श्री. नथू राठोड, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पूर्व), मुंबई यांच्यावर दि. २५ मे, २०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली.
(२) सदरची रक्कम लोकसेवक श्री. नथू राठोड, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पूर्व), मुंबई यांच्या घराच्या छतावर मिळून आली आहे.
(३) लोकसेवक श्री. नथू राठोड, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगाव (पूर्व), मुंबई यांना कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या दि. ०१ जून, २०२१ रोजीच्या आदेशान्वये अटकेच्या दिनांकापासून निलंबीत केले आहे. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने श्री.राठोड, यांच्या अपसंपदेची दि. २८.५.२०२१ रोजी उघड चौकशी सुरु केली आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील कोढ़ाळी-नागपूर मार्गावरील इंडस पेपर मिलमध्ये लागलेल्या आगीबाबत**

**(४१) २९०६९ (१७-०६-२०२१). श्री.टेकचंद सावरकर (कामठी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील कोढ़ाळी-नागपूर मार्गावरील इंडस पेपर मिलमध्ये माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आग लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पेपर मिलचे अग्निशमन आर्थिक तपासणी (फायर फायटींग ऑडीट) देखील झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आजही जुन्या पद्‌धतींचा वापर करुन नियमांचे उल्लघंन करत असतांना सुरक्षेच्यादृष्टीने अनेक मिल मध्ये सुविधायुक्त व्यवस्था केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन सुरक्षेच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१३-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

इंडस पेपर मिल (नवीन नाव- ओरीगामी सेल्यूलोस प्रा.लि.,) मौजा खेरी, अमरावती रोड, जि.नागपूर या कारखान्यात दि.०३.०५.२०२१ रोजी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास कारखान्याच्या परिसरामधील गोडाऊनमध्ये साठवणूक केलेल्या वेस्ट पेपरला (कच्चा माल) आग लागली.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये इमारतींच्या अग्निसुरक्षा व्यवस्थेचे लेखापरीक्षण करण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. परंतु, सदर कारखान्यामध्ये विविध अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांची पुर्तता करण्यात आली असल्याचे संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी कळविले आहे.

(४) सदर अपघाताची उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,नागपूर यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

कारखान्यात वेस्ट पेपर पासून टिश्यू पेपर, टॉयलेट पेपर रोलचे उत्पादन केले जात असून कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया कोव्हीड- १९ मुळे बंद होती. दि. ०३.०५.२०२१ रोजी कारखान्याच्या परिसरातील गोडाऊन मध्ये साठवणूक केलेल्या वेस्ट पेपर (कच्चा माल) वर बाहेरच्या परिसरातून वादळीवाऱ्यामुळे ठिणगी पडल्याने आग लागली. हवेमुळे आग इतरत्र गोडाऊनमध्ये पसरली. सदर आगीत कोणताही कामगार जखमी झालेला नाही.

महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा) नियम, २०१४ नुसार एखाद्या कारखान्यात २५० पेक्षा जास्त कामगार काम करीत असतील तर, त्या कारखान्याचे वर्षातून एकदा अंतर्गत सुरक्षा लेखा परिक्षण (Internal Safety Audit) कारखान्याच्या तज्ञ व्यक्तींकडून आणि कारखान्याचे बाहय सुरक्षा लेखा परिक्षण (External Safety Audit) दोन वर्षातून एकदा शासनमान्य सुरक्षा लेखा परिक्षकाद्वारे करणे आवश्यक आहे.

सदर कारखाना व्यवस्थापनाने कारखान्याचे सुरक्षा लेखा परिक्षण न केल्यामुळे महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा) नियम, २०१४ च्या नियमभंगाबाबत भोगवटादाराविरूध्द मा. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांच्या न्यायालयात खटला दाखल करण्यात आला अूसन कारखान्यास सुरक्षेच्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीवर्धन (जि.रागयड) मधील बागमांडला आणि बाणकोट (जि.रत्नागिरी) येथील खाडीवरील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(४२) २९२७४ (१२-०६-२०२१). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागमांडला (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) आणि बाणकोट (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या दरम्यानच्या खाडीवर वरळी सी लिंकप्रमाणे सागरी महामार्गावरील महत्वाकांक्षी सागरी सेतू बांधण्याचे कामास सात वर्षाच्या कालावधी होऊनही काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सागरी सेतू च्या बांधकामास अद्यापपर्यंत एकूण रु.१२७.५३ कोटी इतका खर्च झाला असून ठेकेदाराच्या आर्थिक अडचणींमुळे सदर काम संथगतीने चालू असल्याचे निदर्शनास आले असून, उक्त पुलाचे दिनांक ३० एप्रिल, २०१८ पासून पूर्णत: बंद असलेले बांधकाम पुनश्च सुरु करण्यात आले आहे काय, असल्यास, बांधकाम पूर्ण होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,
(३) तसेच उक्त सागरी सेतूचे प्रलंबित काम विनाविलंब पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१४-१०-२०२१) : (**१) होय.
(२) सदरचा सागरी सेतू हा कार्यकारी अभियंता, ठाणे खाडी पूल विभाग क्र.१, कोकण भवन यांचे पत्र जा.क्र.ठाखापूवि-१/प्रशा/६४५/२०२१, दि.२५.०५.२०२१ या पत्रान्वये MSRDC कडे हस्तांतरित करण्यात आला आहे. पुलाचे बंद काम सुरु करण्याची कार्यवाही सुरु असून, पुढील २४ महिन्यात पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) शासनाच्या आदेशानुसार, सदर प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यात आला असून, महामंडळामार्फत पुलाचे प्रलंबित काम सुरु करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिळफाटा-कोन (जि.ठाणे) या रस्त्यामध्ये बाधीत होणाऱ्या नागरिकांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(४३) ३०५५२ (१८-०६-२०२१). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिळफाटा-कोन (जि.ठाणे) या रस्त्यामध्ये बाधीत होणाऱ्या नागरिकांना अद्यापही नुकसान भरपाई मिळाली नसल्याची बाब दिनांक २५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम सुरु असतानाही नुकसान भरपाई न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तदनुसार बाधितांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच भरपाई केंव्हापर्यंत मिळणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (१४-१०-२०२१) : (**१) अंशत: खरे आहे.

कल्याण-शीळ रस्ता बाधितांना मोबदला मिळण्याबाबतचे दि.२३ ऑक्टोंबर, २०१८ चे पत्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास दि.२४ ऑक्टोंबर, २०१८ रोजी प्राप्त झाले.

(२) भिवंडी-कल्याण-शिळफाटा या २१.१ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी १४ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे चौपदरीकरण कल्याण डोंबिवली महानरगपालिका / सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी करुन दि.३१.०१.२००५ रोजी रस्ता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरीत केला. तद्नंतर उर्वरीत ७.१ कि.मी. रस्त्याचे चौपदरीकरण महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात आले. सदर रस्ता हस्तांतरणाच्या वेळी त्याची रुंदी ३० मी. दर्शविण्यात आली होती.

उपरोक्त अ.क्र.१ येथील मागणीपत्रामध्ये नमूद संदर्भिय पत्र सहायक संचालक, नगररचना, महापालिका कार्यालय, कल्याण यांचे पत्र क्र.५२१६, दि.०५.०२.२००० अन्वये संबंधीतांस रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या जमिनीचा मोबदला म्हणून चटई क्षेत्र वापरण्यात संमती देणेबाबत काही कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्याची छाननी झाल्यानंतरच जमीन मोबदला (विकास हक्क प्रमाणपत्र) जारी करण्यात येईल, असे नमूद आहे.

(३) या प्रकल्पांतर्गत सहापदरीकरण करण्यासाठी ज्या ठिकाणी भुसंपादनाची आवश्यकता आहे त्या ठिकाणची भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्याला अन्नधान्याचा पुरवठा करणाऱ्या शासकीय गोडाउनमध्ये धान्याचा तुटवडा असल्याने लाभार्थी वंचित असल्याबाबत**

**(४४) ३०८९६ (१८-०६-२०२१). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्याला अन्नधान्याचा पुरवठा करणा-या शासकीय गोडाउनमध्ये धान्याचा तुटवडा असून लाभार्थी धान्यापासून वंचित असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा वाहतूक कंत्राटदारांकडून धान्य पाठविण्यास नकार देणा-यांवर कारवाई करण्याची मागणी माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच बुलढाणा जिल्हयातील अनेक रेशन दुकानातून माहे जानेवारी, २०२१ पासून तूरडाळ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (३०-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भीमा (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) नदीच्या पात्रातून वाळू माफिया अवैधरित्या वाळू उपसा करित असल्याबाबत**

**(४५) ३१४४१ (१७-०६-२०२१). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर शहर व तालुक्यातील भीमा (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) नदीच्या पात्रातून वाळूमाफिया अवैधरित्या करोडो रुपयांची वाळू उपसा करित असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुषंगाने भीमा नदीच्या पात्रातुन अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या संबंधित वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१३-१०-२०२१) :** (१), (२) व (३) पंढरपूर शहर व तालुक्यातील भीमा नदीच्या पात्रातून वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता महसूल व पोलीस प्रशासनामार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते. त्यानुसार माहे मार्च, २०२१ ते मे, २०२१ या कालावधीत पंढरपूर शहर व तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी ६९ गुन्हे दाखल करण्यात आलेले असून त्यामध्ये २ जेसीबी, ६८ वाहने, १ बैलगाडी, १ लाकडी होडी आणि ३३ ब्रास वाळू जप्त करण्यात आली आहे. या संपूर्ण सामग्री व वाळूची एकूण किंमत रु.२,१२,७१,०००/- इतकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टाळेबंदी काळात रसवंती चालकांना तथा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणेबाबत.**

**(४६) ३२२९३ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाळेबंदी काळामध्ये ऊस रस व्रिक्री व्यवसाय पूर्णपणे बंद असल्याने शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला ऊस तसाच शिल्लक राहिला असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रसवंती चालक आणि ऊस उत्पादक शेतकरी यांना झालेल्या नुकसान भरपाई पोटी आर्थिक पॅकेज देण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ एप्रिल, २०२१ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे लेखी पत्र त्यांच्या मेल वर पाठवून केली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०५-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही. राज्यात गाळप हंगाम २०२०-२१ मध्ये ऊस शिल्लक राहिलेला नाही.
(२) होय.
(३) राज्यात गाळप हंगाम सन २०२०-२१ मध्ये ऊस शिल्लक राहिलेला नसल्यामुळे आणि ऊस नियंत्रण आदेश, १९६६ मध्ये रसवंती चालक व ऊस उत्पादक शेतकरी यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तरतूद नसल्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्ह्यातील मोलकरीण पॅकेजसाठी पात्र नसल्याबाबत

**(४७) ३२३०१ (०४-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यामध्ये जवळपास चार हजार घरकाम करणाऱ्या महिलांची कामगार कार्यालयात नोंदणी केलेली असून जवळपास १० हजार घरकाम करणाऱ्या महिला नोंदणीच्या प्रतीक्षेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टाळेबंदी काळात नोंदणीकृत घर काम करणाऱ्या महिलांना मदत देण्यासाठी राज्य शासनाने पॅकेजची घोषणा केली होती हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील एकाही घर काम करणाऱ्या महिलांनी नूतनीकरण केले नसल्याने आर्थिक मदतीसाठी त्या अपात्र ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नूतनीकरण झाले नाही तरीसुद्धा त्यांना मदत देण्यात यावी अशी मागणी दिनांक १७ एप्रिल, २०२१ वा त्या सुमारास घरकाम करणाऱ्या महिलांच्या वतीने जिल्हा कामगार अधिकारी बुलढाणा यांच्याकडे केली हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाकडून त्यांच्या नुतनीकरणास आर्थिक मदत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१४-१०-२०२१) :** (१) बुलढाणा जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ३८७४ इतक्या घरेलू कामगारांची नोंदणी झालेली आहे. सद्य:स्थितीत बुलढाणा जिल्ह्यातील कामगार अधिकारी कार्यालयात घरेलू कामगारांची नोंदणी सुरु आहे.
(२), (३), (४) व (५) टाळेबंदी काळात घरेलू कामगारांना अर्थसहाय्य करण्यासाठी दि.३०.०४.२०२१ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील १,०५,५०० घरेलू कामगारांना टाळेबंदी काळात प्रत्येकी रु.१५००/- याप्रमाणे एकूण रु.१५.८२ कोटी इतके अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच दि.०४.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३१.०३.२०२१ पर्यंत घरेलू कामगार मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या परंतु वार्षिक नुतणीकरण करु न शकलेल्या सर्व घरेलू कामगारांना आर्थिक सहाय्यासाठी पात्र ठरविले आहे. बुलढाणा जिल्ह्यात दि.३०.०६.२०२१ अखेरपर्यंत एकूण २५५ घरेलू कामगारांना प्रत्येकी रु.१५००/- प्रमाणे रु.३,८३ लाख इतके अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

---

**नोंदणीकृत परंतु नूतनीकरण न झालेल्या कामगारांना आर्थिक पॅकेजचा लाभ देणेबाबत**

**(४८) ३२३०२ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात विशेषतः बुलढाणा जिल्ह्यामध्ये नोंदणीकृत अनेक बांधकाम मजूर असून त्यांच्यासाठी शासनाने लॉक डाऊन काळात आर्थिक मदतीची ची घोषणा केलेली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोंदणीकृत बांधकाम मजुरांचे नूतनीकरण झाले नसल्याने ते मदत मिळण्यास अपात्र ठरत आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नोंदणीकृत परंतु नूतनीकरण न झालेल्या बांधकाम मजुरांना सुद्धा आर्थिक पॅकेजचा लाभ देण्यात यावा अशी मागणी माहे एप्रिल, २०२१ च्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कामगार अधिकारी कार्यालय, बुलढाणा या ठिकाणी केली हे खरे आहे काय
(४) असल्यास, याबाबत शासनाने नोंदणीकृत परंतु नूतनीकरण न झालेल्या कामगारांना सुद्धा आर्थिक पॅकेजचा लाभ देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१३-१०-२०२१) :** (१) होय. हे खरे आहे, टाळेबंदीच्या काळात शासनाच्या दिनांक १८.०४.२०२०, दिनांक १३.०८.२०२० व दिनांक २२.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांना अनुक्रमे रु.२०००/-, रु.३०००/- व रु.१५००/- इतके अर्थसहाय्य देणेबाबत मंजूरी देण्यात आली आहे.
(२) नोंदित परंतु नुतनीकरण न झालेल्या बांधकाम कामगारांना केवळ अटल आहार योजनेचा लाभ व त्यासाठी आकारण्यात येणाऱ्या रु.५/- इतक्या शुल्कापासून सूट देण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
नोंदणीकृत तथापि नुतनीकरण न झालेल्या बांधकाम मजूरांना आर्थिक पॅकेजचा लाभ देण्यात यावा अशी मागणी माहे एप्रिल, २०२१ च्या सुमारास सरकारी कामगार अधिकारी, बुलढाणा कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने अनोंदित बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन देण्याचा व त्यासाठी आकारण्यात येत असलेल्या रु.५/- पासून सूट देण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड शहरातील इमारत व इतर बांधकामांवरील कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(४९) ३२३३९ (०५-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या कामगार कल्याण विभागामार्फत इमारत व इतर बांधकामांवरील कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजनेतून पिंपरी-चिंचवड शहरातील इमारत, इतर बांधकाम व नाक्यावरील नोंदणीकृत कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ देण्यात येत असून सदर कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ देण्यासाठी कार्ड वितरित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बांधकाम, इतर बांधकाम व नाक्यावरील बांधकाम मजुरांना मोफत मध्यान्ह भोजन योजना कामगार मंत्रालय, कामगार कल्याण मंडळाकडून शहरातील नाके, बांधकाम साईट सुरु असलेल्या ठिकाणी उक्त योजनेतून जेवण देण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुसऱ्या टाळेबंदी दरम्यान बिल्डर लॉबीच्या लेबर कॅम्प मधील परप्रांतीय कामगारांना कामगार कल्याण मंडळाच्या वतीने मध्यान्ह भोजन वितरित करण्यात आले परंतु, बांधकाम, इतर बांधकाम व नाक्यावरील बांधकाम मजुरांना सदर मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ देण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाक्यावरील बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ मिळाला नसल्याच्या तक्रारी कामगारांकडून व कामगार संघटनेकडून कामगार आयुक्तांकडे करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड शहरातील नाक्यावरील बांधकाम मजुरांना आणि छोटे बांधकाम साईटवरील मजुरांना मध्यान्ह भोजन योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे. अप्पर कामगार आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयामार्फत मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत बांधकाम कामगारांना कार्ड वाटप करण्यात आले आहे.
(२) व (३) शासन पत्र दिनांक २७.०४.२०२१, दि.१२.०५.२०२१, दि.१६.०६.२०२१ व दि.१३.०८.२०२१ अन्वये राज्यातील सर्व जिल्हयांत बांधकाम साईट सुरु असलेल्या ठिकाणी तसेच नाक्यावरील बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन पुरविणेस शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) हे खरे आहे.
नाक्यावरील बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनेचा लाभ मिळण्याबाबत बांधकाम कामगार सेना, संघटनेचे अध्यक्ष श्री.जयंत शिंदे यांचे दिनांक ०३.०२.२०२१ रोजीचे निवेदन पुणे कार्यालयास प्राप्त झालेले आहे.
(५) शासन पत्र दिनांक २७.०४.२०२१, दि.१२.०५.२०२१, दि.१६.०६.२०२१, दि.१३.०८.२०२१ व दि. २७.०८.२०२१ अन्वये सर्व जिल्हयांत बांधकाम साईट सुरु असलेल्या ठिकाणी तसेच नाक्यावरील बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन पुरविणेस शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी-चिंचवड शहरातील कामगारांचे वेतन मिळण्याबाबत**

**(५०) ३२३५२ (०४-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील फुगेवास्ती, भोसरी येथे ताज फ्लेस्टो दिघी मॅगझीन येथे पिंपळे गुरव येथील शाहू गोरख गायकवाड व इतर दोन कामगार दीड वर्षापासून कार्यरत असून सदर कंपनीतील कामगारांना वेळेवर वेतन मिळत नसून कामगारांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना प्रादुर्भाव काळातील माहे मार्च, व एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान वेतन अद्यापही दिला नसल्याने या कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त वेतन मिळण्याबाबत संबंधित कामगारांनी कामगार, उप आयुक्त, पुणे जिल्हा यांच्याकडे दिनांक १४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित कामगारांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१३-१०-२०२१) :** (१), (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे. पुणे शहरातील फुगे वस्ती, भोसरी येथे ताज फ्लेस्टो दिघी मॅग्झीन येथील ०३ कामगारांना माहे मार्च २०२१ व एप्रिल २०२१ चे वेतन मिळणेबाबत दिनांक १४/०५/२०२१ रोजी कामगार उप आयुक्त, पुणे या कार्यालयास तक्रार प्राप्त झाली होती.
(४) कामगार उप आयुक्त, पुणे कार्यालयाने मालकाकडे पाठपुरावा करून कामगारांना थकित वेतन मिळवून दिले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.